म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : बा. वा.
दा. क्र. २८८९

BVBK-0402889

निवेदक:
शंकर अभ्यंकर

# देवमाशाच्या जबड्यात

'मॉबी डिक' या जगप्रसिद्ध कादंबरीचा
संक्षिप्त अनुवाद

BVBK-0402889

मेहता पब्लिशिंग हाऊस

■ प्रथमावृत्ती नोव्हेंबर, १९९३

■ प्रकाशक
सुनील अनिल मेहता,
मेहता पब्लिशिंग हाऊस,
१२१६, सदाशिव पेठ,
पुणे.

■ मुद्रक
संगम प्रेस प्रा. लि.,
कोथरूड,
पुणे.

■ अक्षरजुळणी
इन्द्र कॉम्प्युटर्स,
'तृप्तिदीप', ४१, एल. आय. सी. कॉलनी,
योगाचार्य कोल्हटकर पथ,
४२/२, पर्वती
पुणे.

■ मुखपृष्ठ
बाबू उडुपी

■ किंमत पंचवीस रुपये

■ © सौ. अपर्णा अभ्यंकर

. वं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
वा. क्र. 2LLe दिनांक . . . .
विषय बा-वा क्र. . ........

गोष्टीवेल्हाळ
अभिजित, जितेन्द्र, अश्विनी
आदित्य आणि अमित
यांना-

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १. नरभक्षक ? | ५ |
| २. 'पिकॉड'ची जादू | १२ |
| ३. कॅप्टन अहब | २१ |
| ४. पहिली शिकार | ३२ |
| ५. मॉबी डिकच्या जबड्यात | ४३ |
| ६. शेवटची झुंज | ५१ |

2LLe

## १. नरभक्षक ?

माझं नाव इस्माईल. आडनाव- पण आडनाव सांगण्याचं कारणच नाही म्हणा. कारण मला आडनावानं कुणीच ओळखत नाहीत. सगळेजण मला इस्माईल म्हणतात. माझ्याही मनात आता तेच नाव पक्क बसलंय्. इतकं की माझं आडनावही मी आता पार विसरून गेलोय्.

माझा स्वभाव तसा उतावळा नाही. पण चार भिंतीत मला कधीही चैन पडत नाही. माझा जीव अगदी गुदमरून जातो.

आयुष्यातले काही दिवस शिक्षकी पेशात घालवल्यावर मी कंटाळलो. मुलांवर माझा जीव होता. पोरंही माझ्यावर जाम खूष होती. पण मीच शेवटी कंटाळलो.

लहानपणापासून मला समुद्राचं नको इतकं आकर्षण होतं. समुद्राच्या पाण्याची मला कधीच भीती वाटली नाही. पण समुद्रावर नाव गाजवण्याची महत्वाकांक्षाही मला नव्हती. कारण माझ्या मर्यादा मला माहीत होत्या.

कॅप्टन किंवा ॲडमिरल होण्याइतकं मोठेपण आपल्याजवळ नाही, हे मला मान्य. पण खलाशी होण्याचा चिवटपणा माझ्याजवळ होता.

आता खलाशी म्हणून आयुष्य काढायचं, म्हणजे काही थट्टा नव्हे. उन्हात रापलेले, दोर ओढून हाताला घट्टे पडलेले आणि धन्यासाठी केव्हाही स्वतःला दर्यात झोकून देणारे खलाशी पाहिलेत की मी काय म्हणतोय् ते कळेल. खलाशांचं सगळं जीवन पाण्यातल्या माशासारखंच म्हणा ! पण त्यात आव्हान आहे.

उगाच चार भिंतीतलं मिळमिळीत आयुष्य जगण्यापेक्षा हे आव्हान स्वीकारणं

मला आवडलं.

शिक्षकी पेशाला मी रामराम ठोकला तो तेवढ्यासाठी आणि सरळ आलो ते न्यू बेडफोर्ड इथं.

डिसेंबर महिना होता तो. शनिवारची सकाळ. हवेत इतका गारठा होता की अंगात गरम कपडे असूनही मी पार काकडलो होतो.

इतक्या थंडीत मी आलो खरा, पण नशीब मला अनुकूल नव्हतं. नॅनटकेटकडं जाणारं जहाज आदलेच दिवशी किनारा सोडून महासागरात रवाना झालं होतं.

नॅनटकेट हे अॅटलांटिक महासागरात असलेलं एक प्रसिध्द बेट आहे. तिथल्या संपत्तीबद्दल मी खूपच ऐकलं होतं. त्यामुळं जहाज गेल्याचं ऐकून मला अतिशय वाईट वाटलं.

अमेरिकेचा हा मॅसेचुसेटस् राज्याचा भाग. इथं समुद्रात माशांची उणीव नाही. समुद्रात शार्क मासे भरपूर सापडतात. पण जहाजावरच्या लोकांना त्या शार्क माशांचं फारसं आकर्षण नाही. कारण या समुद्रात देवमासे भरपूर सापडतात आणि देवमाशांची शिकार करायची म्हणजे मजाच. मजा म्हणजे कथा ऐकायलाच गंमत. पण प्रत्यक्ष मात्र सगळा जिवावरचा खेळ. देवमाशाची शिकार करायला खलाशी बाहेर पडतात ते आपल्या बायकोचा शेवटचा निरोप घेऊनच. इतका तो सगळा जिवावरचा खेळ असतो.

नॅनटकेटकडं जहाज निघून गेलेलं असल्यामुळं माझा अगदी नाइलाज झाला आणि रात्रीची सोय पाहाणं आलं.

खानावळीच्या शोधात मी तिथं भरपूर हिंडलो. पण सगळ्या खानावळी भयानक महागड्या. आता काय करायचं ?

संध्याकाळपर्यंत वणवण केल्यावर शेवटी मला एक खानावळ सापडली. त्या खानावळीचं नावही मोठं गमतीशीर होतं. 'दि व्हेल फिशर'. मला हसूच आलं. खानावळ तशी घाणच होती, पण माझ्या खिशातल्या पैशांना यापेक्षा अधिक काही परवडणं केवळ अशक्यच होतं.

खानावळीचं नाव जितकं गमतीशीर होतं त्याहीपेक्षा खानावळीचा मालक अजब होता. त्याचं नाव होतं पीटर कॉफीन. कॉफीन म्हणजे शवपेटी. पण हा गृहस्थ अजून जिवंत असल्याचं पाहून मला गंमत वाटली.

पीटर कॉफीनचं व्यक्तिमत्वही मोठं होतं. त्याच्या अंगावर मोठे चमत्कारीक

कपडे होते. डोळे बटबटीत होते. डोक्यावर भलं मोठं टक्कल. कानावर उगाच कुठंतरी शिल्लक राहिलेले केस. गाल मात्र गोबरे. अगदी टोमॅटोसारखे नसले, तरी सफरचंदासारखे निश्चितच होते.

त्याच्या टेबलासमोर उभं राहून मी काही बोलण्यापूर्वीच त्यानं माझ्याकडं थंड पण प्रश्नार्थक नजरेनं पाहिलं. त्याच्या डोळयात एक विचित्र भाव होता.

मी पटकन् म्हटलं,

'मला रात्रीपुरती जागा मिळेल का ?'

तो एकदम कसातरीच बटबटीत हसला. म्हणाला,

'माफ करा. खानावळीत अजिबात जागा नाही.'

मी तर गडबडलोच. बाहेर तर भयानक थंडी होती. अशा वेळी बाहेर पडायचं म्हणजे जिवावरचा खेळ. मी मेलो असतो, तर माझ्यासाठी दुः ख करणारंही कोणी नव्हतं. मरण आलं तरी चालेल, पण ते समुद्रावर यावं, खलाशाचं काम करत असताना यावं हीच माझी इच्छा होती.

मी आजीजीच्या स्वरात म्हटलं,

'बघा काही व्यवस्था होत असेल तर. मी फार लांबून आलोय्. भयंकर दमलोय्. आणि बाहेर तर जीवघेणी थंडी पडलीय्. मला जागा दिलीत तर तुमचे उपकारमी जन्मभर विसरणार नाही.'

आपले पिवळे पडलेले दात दाखवत तो हसला आणि म्हणाला,

'ठीक आहे --- पण तशी स्वतंत्र जागा मिळायची नाही. त्या कोपऱ्यातल्या खोलीत एक अनुभवी शिकारी राहतो.--- शिकारी म्हणजे देवमाशावर दोर लावलेला भाला फेकण्यात तो अगदी प्रवीण आहे. त्याच्या खोलीत डबल बेड आहे. तिथं झोपणार का ?'

बाहेर थंडीत मरण्यापेक्षा घाण वास येणाऱ्या खलाशाबरोबर झोपलं तर काय वाईट ? चेहऱ्यावर फारसा आनंद दिसू नये, याची काळजी घेत मी म्हणालो,

'चालेल. खोलीत एखादा प्रवासी असला तरी चालेल.'

होकार देण्यामागं माझा आणखी एक स्वार्थ होता. खोलीतला माझा जोडीदार अनुभवी खलाशी आहे, हे समजल्यावर मला मनातल्या मनात अतिशय आनंद झाला होता. कारण मला खलाशीच व्हायचं होतं. या खलाशाचं बोट पकडून कोणत्याही जहाजावर प्रवेश मिळवणं मला अगदी सोपं जाणार होतं, यात शंकाच

नव्हती.

खानावळीत बसलेल्या लोकांवर मी नजर फिरवली आणि पीटर कॉफीनला विचारलं,

'कोण आहे, यातला माझा दोस्त ?'

पीटर कॉफीननं नकारार्थी मान हलवली. तो म्हणाला,

'तुझा मित्र इथं नाही. तो गावात गेलाय्.'

'आता ? यावेळी ?', मी आश्चर्यानं विचारलं.

'का ? त्यात आश्चर्य काय ? त्यानं काही डोकी विकायला आणली आहेत.'

'काय ?', मी थक्क होऊन ओरडलो, 'उगाच थापा मारू नका.'

पीटर कॉफीननं माझ्याकडं चमत्कारिक नजरेनं पाहिलं. तो म्हणाला,

'तू काय अर्धवट आहेस का ? डोकी म्हणजे काय तुला माणसांची वाटली ? मोठ्या माशांची डोकी त्यानं बरोबर आणली आहेत. बारा पैकी अकरा त्यानं खपवलीही. आता शेवटचं विकायला गेलायं.— पण त्याचं स्वतः चं डोकही तो विकायला कमी करणार नाही म्हणा. त्याचं स्वतः चं डोकं तसचं आहे.'

स्वतः च्याच विनोदावर खूष होऊन कॉफीन अगदी गदगदा हसला. माझी झोप मात्र पार उडाली. आपला खानावळीतला खलाशी मित्र कसा असेल, या भावनेनं मी अगदी अस्वस्थ होऊन गेलो.

पीटर म्हणाला होता की माझी खोली कोपऱ्यातच आहे. प्रत्यक्षात मात्र ती पहिल्या मजल्यावर होती. खोली तशी लहानच होती. खोलीतला फायरप्लेसमधला जाळ विझला होता. तरीही खोलीत एक प्रकारची ऊब होती. पीटर कॉफीनला धन्यवाद देऊन मी कपडे बदलले आणि गादीवर पडलो.

प्रवास आणि दिवसभराची दगदग यामधे माझा अगदी पिट्टा पडला होता. श्रमानं पाय दुखायला लागले होते. तरी सुध्दा मला झोप येईना. मी नुसता या कुशीवरून त्या कुशीवर वळत होतो. असा किती वेळ गेला कुणास ठाऊक ! बहुधा तास दोन तास तरी गेले असावेत.

खानावळीत सगळी सामसूम पसरली होती. काही वेळ स्तब्ध शांततेत गेला. मग लाकडी जिन्यावर पावलं वाजायला लागली. मी भित्रा नव्हे, पण त्यावेळी माझ्यावर खरोखरच दडपण आलं.

खोलीचा दरवाजा उघडला गेला आणि आत प्रवेश केला तो उंचापुऱ्या

व्यक्तीनं. माणूस कसला, भयंकर दैत्यच होता तो !

थोड्या उजेडात मला नीट दिसत नव्हतं. पण एखाद्या योध्द्याच्या अंगावर असावेत तसे त्याच्या सगळ्या अंगावर शस्त्राचे घाव होते. त्या खुणांमुळं तो मनुष्य भयंकर दिसत होता.

पलंगाजवळ आल्यावर त्यानं माझ्याकडं नजर टाकली. माझ्या पोटात भीतीचा गोळा फिरला. मला वाटलं आता तो राक्षस आपल्याला उचलून बहुधा बाहेर फेकणार.

त्यानं मला एक क्षणभर पाहिलं आणि न पाहिल्यासारखं करून तो माघारी वळला.

तेवढ्या वेळात मी त्याला नीट पाहिला. आडदांड देहाचा, राक्षसी चेहऱ्याचा तो खलाशी रेड इंडियन होता. त्याचा चेहरा, शरीर आणि नजरेतील थंड भाव पाहिल्यावर वाटलं, हा नरभक्षकच असला पाहिजे.

माझ्याकडं त्यानं अजिबात लक्ष दिलं नाही. खोलीच्या कोपऱ्यात त्यानं आपली बॅग ठेवली. गुडघे टेकून तो खाली बसला.

एका पिशवीतून त्यानं एक मूर्ती बाहेर काढली. मूर्ती समोर ठेवून त्यानं त्या मूर्तीकडं टक लावून पाहिलं. ती मूर्ती सुध्दा मोठी चमत्कारिक अक्राळ विक्राळ होती.

त्या माणसानं खिशातून कसलीशी पूडबाहेर काढली आणि जवळच पेटवलेल्या मेणबत्तीवर जाळली. खोलीत सगळीकडं धूर पसरला. अतिशय शांतपणानं त्यानं काही मंत्र म्हणायला सुरवात केली.

त्याचे सगळे मंत्रही मोठे चमत्कारिक आणि भीती वाटावे असेच होते. मी श्वास रोखून त्याच्या सगळ्या कृती न्याहाळत होतो. मेणबत्तीवर त्यानं जाळलेली माती मी ओळखली. असली माती फक्त जहाजावरंच वापरतात, हे मला पक्कं माहीत होतं.

मेणबत्तीच्या उजेडात त्याचं पिळदार शरीर मला अगदी स्पष्ट दिसत होतं. आणखी एक गोष्ट माझ्या लक्षात आली आणि ती म्हणजे त्याच्या देहावर शस्त्राच्या घावाच्या जखमा नव्हत्या.

त्याच्या सगळ्या शरीरावर गोंदलेलं होतं. रेड इंडियन लोकात अशी गोंदण्याची पध्दत असते.

अगदी डोक्यापासून कमरेपर्यंत गोंदलेली त्याची आकृति मेणबत्तीच्या उजेडात आणखीनच भयंकर दिसत होती.

त्या भयंकर माणसाची पूजा आटोपल्यावर त्यानं आणखी एक भयानक कृती केली. त्याच्या पिशवीतून त्यानं त्याची छोटी कुऱ्हाड बाहेर काढली.

सगळी कुऱ्हाड कपड्यात गुंडाळलेली होती. फक्त पातं तेवढं उघडं होतं. मेणबत्तीच्या उजेडात त्या धारदार कुऱ्हाडीचं पातं लखलखलं.

आता मात्र भीतीनं माझी अक्षरशः बोबडी वळली होती. सैतानाची पूजा केलेला हा नरराक्षस आपला बळी देणार का काय ? कारण अशी माणसं नरभक्षक असतात, असं मी ऐकून होतो.

त्या माणसानं त्याच्या पिशवीतून एक लांबलचक चिलीम बाहेर काढली. पिशवीतून आणलेली अनेक पानं त्यानं चिलिमीत भरली. मेणबत्तीवर चिलीम धरून त्यानं जोरदार श्वास घेतला.

एकदम जाळ झाला आणि छतापर्यंत गेला. धुरानं सगळी खोली भरून गेली.

भीतीनं मी किंकाळी फोडली आणि कॉटवरून टुणकन् उडी मारून पीटरच्या नावानं हाका मारायचा सपाटा लावला.

माझ्या किंकाळ्या ऐकून पीटर कॉफीन धावतंच माडीवर आमच्या खोलीत आला.

माझ्या किंकाळ्या ऐकून तो मनुष्य भयानक उखडला आणि कुऱ्हाड उचलून माझ्याकडे धावत येत ओरडला,

'चूप ! कुऱ्हाड मारीन !'

पीटर कॉफीन आमच्या खोलीत शिरला आणि मोठ्यानं खेकसला,

'काय चाललयं ? तुमच्या या भांडणानं माझ्या खानावळीतली सगळी माणसं जातील ना पळून ! मग कोण येईल माझ्या खानावळीत ?'

'मग ? मी तरी काय करू ? हा सैतान आहे ना खोलीत ?', मी सुध्दा जोरात ओरडलो.

'कोण ? हा ? हा क्विकेग ?' हसत हसत पीटर म्हणाला, 'क्विकेग, गाढवा, तुझी कुऱ्हाड घे खाली.'

क्विकेगनं मुकाट्यानं कुऱ्हाड खाली ठेवली. पीटर मला म्हणाला,

'हा क्विकेग अगदी गरीब माणूस आहे. अडाणी आहे. शिक्षण नसल्यामुळं

त्याला कसं वागावं, हेच कळत नाही. --- तू ओरडल्यामुळं त्याला भीती वाटली. त्यामुळं तो तुझ्यावर चाल करून आला असावा.'

मी सुटकेचा निःश्वास टाकून घाम पुसला. म्हणजे हा नरभक्षक नाही तर? क्विकेग प्रसन्नपणे हसला. आता मात्र माझ्या मनावरचं दडपण उतरलं.

- आणि एकाच पलंगावर मी आणि क्विकेग आरामात झोपलो. यावेळेला मात्र मला अगदी गाढ झोप लागली.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही दोघंही खुषीत होतो.

मी क्विकेगला म्हटलं, 'हे तुझं नाव भलतच अवघड आहे बुवा. मी तुला फक्त केग या नावानं हाक मारली तर चालेल ?'

क्विकेग हसला. त्यानं फक्त मान हलवली. होकारार्थी. माझी सगळी कहाणी मी त्याला सांगितली.

केगनं कुऱ्हाडीच्या पात्यावरून बोट फिरवलं आणि स्वतःची चित्तरकथा मला सांगायला सुरवात केली---

***

## २. 'पिकॉड'ची जादू

केगची भाषा समजणं म्हणजे दिव्यच होतं. पण त्याच्या मोडक्या तोडक्या भाषेतून केगची सगळी कहाणी मला समजली.

रोकोव्होका नावाच्या एका छोट्या बेटावर केगचा जन्म झाला. दुर्बिणीतून पाहिलं तरच दिसेल, अशा छोट्या बेटावर.

बेटावरच्या टोळीचे प्रमुख होते केगचे वडील. केगचे काका त्यांच्या टोळीचे पुजारी होते. केग तर राजपुत्रच होता. त्याचं बालपण मोठ्या सुखात गेलं. पण पुढं घोटाळा झाला.

रोकोव्होका बेट कित्येक वर्ष अगदी सुखात जगत होतं. पुढं काही खलाशांना त्या बेटाचा शोध लागला. दर्याच्या प्रवासावर असतांना विश्रांतीसाठी म्हणून खलाशी त्या बेटाचा उपयोग करायला लागले.

बेटावरचं आयुष्य गढूळ झालं आणि स्वतः केगचं आयुष्य तर पार पालटून गेलं.

देवमाशांच्या शिकारीबद्दल त्याला या खलाशांकडून कळलं. रोकोव्होका बेटाजवळ भरपूर देवमासे सापडत. खलाशी शिकार कशी करतात, हे केगनं पाहिलं.

तेव्हापासून आपणही या शिकारीत सहभागी व्हायचं त्यानं ठरवलं. वडलांनी, काकांनी त्याची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. पण केगच्या डोक्यातलं खूळ जराही कमी झालं नाही. दिवसेंदिवस ते वाढतच गेलं.

आणि एके दिवशी केगनं गंमत केली. रोकोव्होका बेटावर आलेलं एक जहाज

परत प्रवासाला निघाल्यावर त्यानं आपली होडी बाहेर काढली. झपाट्यानं वल्हवत त्यानं जहाज गाठलं आणि तो जहाजावर चढला.

कॅप्टननं त्याला शिव्या मोजल्या. तरी केगनं परत जायचं नाव काढलं नाही. मग कॅप्टनचा आणि त्याच्या साथीदारांचाही नाईलाज झाला.

या पोराला बरोबर घेऊन ते पुढच्या प्रवासाला निघाले. सागरी जीवन केगला काही नवीन नव्हतं. या नवीन फिरत्या घरात तो चटकन् रमला. तेव्हापासून आजपर्यंत तो जहाजावरच राहीला.

देवमाशावर भाला सोडण्यात तर तो भलताच तरबेज झाला.

'तू तुझ्या घरी परत जाणार नाहीस ?' मी त्याला आश्चर्यानं विचारलं.

आणि रोकोव्होका बेटावर परत जाण्याचा त्याचा खरोखरच विचार नव्हता. आणखी काही देवमासे मारले की नंतर तो स्वतःला देवाच्या प्रार्थनेत रमवणार होता आणि त्याच्या मनाची शुध्दी झाल्यानंतरच रोकोव्होका बेटावर परतण्याचा केगचा विचार होता.

पण सागरी जीवन वाईट असतं, हे मला माहीत होतं. त्यातून माणसाची सुटका होणं मोठं कठीण असतं आणि आता तर माझ्याप्रमाणंच केगही नोकरीच्या शोधात होता.

मी केगला म्हटलं,

'उद्या मी बंदरावर जाणारा आहे. एखाद्या जहाजावर नोकरी मिळते का ती पाहाणार आहे.'

'तू जा. मी नाही', केग म्हणाला.

'पण का ? तुलाही एखाद्या जहाजावर नोकरी हवीय ना ?'

केगनं मान डोलावली आणि पिशवीतल्या मूर्तीकडं बोट दाखवलं.

त्याच्या त्या देवाचं नाव होतं योजो आणि केगनं त्याला कौल लावल्यावर त्यानं बंदरावर जाऊ नये, असं योजोनं त्याला सांगितलं होतं.

अंधश्रध्दा ! पण आता केगचं मन वळवणं अशक्यच होतं !

'केग, मग मी एकटाच जातो आणि तुझ्यासाठीही जहाजाच्या कॅप्टनजवळ शब्द टाकतो. कसं ?'

केगनं आनंदानं उडी मारली.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी बंदराकडं निघालो. हवेत धुकं होतं. बोचरे, थंड

वारे अंगाशी भिडत होते. ब्लँकेट अंगाभोवती गुंडाळत मी बंदर गाठलं. अर्ध्या तासात धुकं कमी झालं.

बंदरात मोजकी जहाजं उभी होती. पण त्यातल्या एका जहाजानं माझं लक्ष वेधून घेतलं. अतिशय सुंदर असं जहाज होतं ते.

जहाजाचं नाव होतं- 'पिकॉड.' जहाजाची रचना जुन्या पध्दतीची होती. मधला लाकडी भाग चांगलाच रूंद पण आटोपशीर होता आणि आता सूर्यप्रकाशात चमकत होता. मधली डोलकाठी ताठ उभी होती. पाण्यावर खालीवर होणाऱ्या 'पिच' चा भाग मी निरखला. या जहाजानं अनेक समुद्र पचवले असले पाहिजेत. जहाजाची दोन्हीकडं जाणारी निमुळती टोकं तोफेच्या तोंडाप्रमाणं दिसत होती.

माझी तबियत जाम खूष झाली.

अशा जहाजावर नोकरी मिळाली, तर किती मजा येईल. मनात मांडे खात मी डेकवर पोचलो.

उन्हात रापलेला एक मनुष्य तिथं बसला होता.

'तुम्ही कॅप्टन आहात ?' मी अदबीनं विचारलं.

'समज, मी कॅप्टन आहे ! पण तुझं काय काम आहे ?' त्या माणसाच्या स्वरात फटकळपणा नसला, तरी आपुलकीही नव्हती. धीर करून मी म्हटलं,

'मला जहाजावर नोकरी पाहिजे.'

आपला सुरकुतलेला चेहरा वर उचलून त्यानं विचारलं,

'अनुभव किती ?'

मान खाली घालून मी म्हटलं,

'नाही !'

'नाही ? मग देवमाशाच्या शिकारीला तुझा काय उपयोग ?'

आता मला नकार मिळणार, असं वाटून मी घाईघाईनं म्हटलं,

'नसेना का अनुभव ! पण मी तरूण आहे. माझी प्रकृती ठणठणीत आहे. आणिऽ-'

'ओ के ! उगाच फुशारक्या मारू नकोस. पण तू जहाजावर नोकरी कशासाठी करणार आहेस ?'

'मला जग बघायचंय् !'

'ओऽ ! या जहाजाच्या कॅप्टनला म्हणतात- अहब. त्याची आणि तुझी कधी

भेट झालीय् ?'

'कोण ? अहब ?' मी किंचाळलोच.

'ओरडू नकोस. अहबच या जहाजाचा कॅप्टन आहे. माझं नाव पेलेग. कॅप्टन पेलेग. हे पिकॉड जहाज माझं आहे. पण सध्या मी ते अहबला दिलंय. थोड्याच वेळात कॅप्टन बिल्हाड इथं येईल. तो माझा जुना मित्र आहे. तो इथं आला की मगच प्रवासाची तारीख आम्ही नक्की करू.'

हे गाडं तर भलतीकडंच निघालं. माझ्या नोकरीचं काय ? मी हळूच म्हटलं,

'पणऽ मी --- जहाजावरऽऽ'

'कॅप्टन अहबला भेट ! मगच आमच्याबरोबर यायचं की नाही, ते ठरव. कॅप्टन अहबला फक्त एकच पाय आहेऽऽ'

माझा अंगावर सर्रकन् काटा आला.

आपलं कपाळ कराकरा खाजवत कॅप्टन पेलेग म्हणाला,

'का ? काय झालं ?'

'म्हणजे देवमाशानं ज्याचा एक पायऽऽ '

'तोच. देवमाशानं त्याचा डावा पाय कचकन् तोडला आणि अहबसमोरच चघळून खाल्ला. अहब कसा वाचला, हे त्याला किंवा त्या देवमाशालाच माहीत.'

माझ्या कपाळावर घाम उतरला.

'देवमाशाबरोबर झुंज देण्याइतकं तुझं काळीज घट्ट असलं, तरच होय म्हण आणि मगच जहाजावर ये. समोरून देवमासा आपल्यावर चाल करून येत असतांना त्याच्यावर भाला फेकायची तयारी आहे तुझी ?'

मी स्वतःला सावरलं. आता मागं पाय घेण्याची सोयच नव्हती. म्हटलं,

'होय. आवश्यकता असेल, तर मी तेही करून दाखवेन.'

'गुड ! ठरलं तर मग. -- पण आमच्याबरोबर यायचं असेल, तर तुला तसं लेखी लिहून द्यावं लागेल.'

'देतो !'

'इतर खलाशांना मिळतात, तेवढे पैसे तुला मिळतील. कबूल आहे ?'

इतक्यात कॅप्टन बिल्हाड तिथं आला. ओरडून म्हणाला,

'आता कोण आहे नवीन ?'

कॅप्टन पेलेगनं माझी ओळख करून दिली.

'हं ! तू इस्माईल काय ? गुड- गुड-- केव्हा येतोस ?'

'उद्या येईन. पण मी एकटा नाही. माझा एक मित्र आहे आणि भाला चालवण्याचा त्याला चांगला अनुभव आहे.'

'त्यालाही घेऊन ये.'

मी उड्या मारतच खानावळीत परतलो. इतक्या झटपट नोकरी मिळेल, असं मला अजिबात वाटलं नव्हतं.

केग सुध्दा जाम खूष झाला.

आमचं सगळं सामान भरून आम्ही समुद्रकिनारा गाठला.

पेलेग आणि बिल्हाड यांनी केगकडं निरखून पाहिलं आणि तेही माझ्याप्रमाणं हादरलेच. मला हसू आलं. केगला पाहून सुरवातीला मी सुध्दा असाच हादरलो होतो.

'हा तर नरभक्षक आहे,' पेलेग बिल्हाडच्या कानाशी कुजबुजला.

दोघांनी पुन्हा एकदा केगला अपादमस्तक न्याहाळलं. मग पेलेगनं विचारल,

'तुला भाल्याची फेक येते का ?'

उत्तर देण्याऐवजी केग पटकन् डेकवरील कठड्यावर चढला. दोरीला बांधलेला भाला हातात घेऊन त्यानं मला खूण केली.

मी कठड्यावरून खाली डोकावून पाहिलं. समुद्राच्या पाण्यावर एकाच जागी फेस जमला होता. त्यावर पन्नास फूट उंचीवरून अचूक नेम मारणं सोपं नव्हतं.

मी कॅप्टन पेलेगकडं वळून म्हटलं,

'कॅप्टन, माझ्या मित्राला भाला फेकता येतो की नाही, हे तुम्हाला पाहायचं आहे ना ! बघा तर गंमत मग. खाली समुद्राच्या पाण्यात एकाच जागी खूप फेस साठला आहे. माझा मित्र नेमका त्याच जागी भाला फेकून दाखवेल-'

माझे शब्द पूर्ण होण्यापूर्वीच केगच्या हातून भाला सुटलाही. त्या फेकीनं पाण्याच्या फेसाचा छेद घेतला आणि बघता बघता भाला पाण्याच्या पोटात गडप झाला.

पेलेगनं आश्चर्यानं आऽ वासला. बिल्हाडच्या नाकावरचा चष्माच खाली घसरला. समुद्रातच पडायचा तो. पण त्यानं तो कसाबसा सावरला.

भाल्याची इतकी अचूक फेक करणारा खलाशी त्यांनी पाहिला नसावा.

आपले फारोळे दात दाखवत केग मोठ्यानं हसला आणि दोराला जोडलेला

तो भाला (हार्पून) त्यानं पाण्याबाहेर खेचून काढला.

आता पेलेगला हर्षवायू झाला होता. आजूबाजूला आम्ही नसतो, तर त्यानं कदाचित् उड्याही मारल्या असत्या.

केगची पाठ थोपटत तो म्हणाला,

'ठीक आहे. उत्तम ! अगदी उत्तम. या करारावर तुला सही करावी लागेल आणि तुझा पैशाचा वाटाही मोठा असेल.'

केगनं समोरच्या कागदावर मोडकी- तोडकी सही केली.

'परवा जहाजावर दाखल व्हा,' बिल्हाडनं सूचना दिली.

जहाज लगेच प्रवासाला निघणार नाही, याचं मला वाईट वाटलं. पण माझा आणि केगचा भाव वाढला आहे, याबद्दल आमची खात्री झाली.

एकमेकाला टप्पल मारत आणि खिदळत आम्ही खानावळीकडं परतलो.

खानावळीच्या दरवाज्यात एक चमत्कारिक मनुष्य उभा होता. त्याच्या अंगावरची चरबी झडली होती. फाटलेले कपडे लोंबत होते. वाढलेले अस्ताव्यस्त केस पांढरे झाले होते.

पण सगळ्यात भयंकर म्हणजे त्याचे डोळे. ते थंड आणि निर्जिव डोळे बघून माझ्या अंगावर सर्रकन् काटा आला.

केगसारखा दांडगा मनुष्यही त्याच्या त्या भयंकर रूपाला बघून दचकून उभा राहिला.

आम्हा दोघांना त्या माणसानं पापणी न हलवता अगदी थंड डोळ्यानं पाहिलं. डोळ्याच्या खोबणीत काचेच्या गोट्या बसवाव्या, तसे त्याचे डोळे दिसत होते.

असे काही क्षण अस्वस्थपणे गेल्यावर धारदार स्वरात तो म्हणाला,

'मूर्खांनो, कशाला स्वतःला असे विकून आलात रे ?'

'म्हणजे काय ?' मी गोंधळून विचारलं.

'स्वतःला कोणत्या संकटात तुम्ही लोटता आहात, याचा विचार तरी करायचा.'

'तुला काय म्हणायचंय् ?'

'का ? मी बोलतोय् ते इतकं अवघड आहे काय ? आता तुम्ही पिकॉड जहाजावरूनच परत आलात ना ?'

'होय ! पण तुला काय करायचंय् ?'

'केवढी चूक केलीत ! अजून विचार करा. माघारी फिरा.'

‘अरे पण तू कोण आम्हाला हे सांगणारा ?’

‘मी कोणी का असेना - सांगतो ते ऐका. अजून माघारी फिरा.’

आता मात्र आम्हाला हसू यायला लागलं. हा अगदी वेडा पीरच दिसतोय्.

केग तर मोठ्यानं हसून म्हणाला,

‘वेडाऽ वेडाऽ !’

पण त्या माणसाची नजर बदलली नाही.

तशाच निश्चयी स्वरात तो म्हणाला,

‘वेडा मी नाही. वेडे तुम्ही आहात. अजून माघारी फिरा. जलप्रवासाला जाऊ नका आणि पिर्कोडवरून तर अजिबात जाऊ नका.’

‘चल, बाजूला हो,’ मी खेकसलो, ‘काहीतरी बडबडू नकोस.--- नाव काय तुझं ?’

यावेळी मात्र तो वेड्यासारखा हसला- आणि म्हणाला,

‘माझं नाव ? माझं नाव एलिजाह !’

मी जरा चमकलोच. इतिहासात या नावाचा एक प्रख्यात द्रष्टा महापुरूष होऊन गेला. हे मला माहीत होतं. केगला बहुधा त्याता पत्ता नसावा.

तास- दोन तासात आम्ही एलिजाहला विसरून गेलो आणि उरलेला वेळ आवश्यक त्या वस्तूंच्या खरेदीत घालवला.

प्रवासाला निघायचा दिवस उजाडला. आम्ही पुन्हा एकदा सामान भरून जहाजाकडं निघालो.

हवा कुंद होती. सगळीकडं धुकं पसरलं होतं. सगळ्या वाटा धुक्यात हरवल्या होत्या. सूर्याचं दर्शन अशक्यच होतं म्हणा.

मी केगजवळ काही बोललो नाही खरा, पण मी मनातून जरा बेचैनच होतो. त्या चमत्कारिक हवेचं सावट माझ्या मनावर उतरलं होतं.

कधी नव्हे ते केगही अस्वस्थ होता. बंदराकडं जातांना तो म्हणाला, ‘धुकं --- अपशकुन--- काय करायचं ?’

मी त्याच्यावर चिडलो.

‘उगाच काहीतरी बडबडू नकोस.’

‘उगाच नाही--- योजोनं चांगला कौल दिला नाही---. ’

मी पुन्हा उखडलो. संता ।नं मी केगवर ओरडणार होतो. इतक्यात नवल घडलं.

अंधारातून पिशाच्च समोर यावं, त्याप्रमाणं धुक्यातून अचानक एलिजाह समोर आला. त्याला बघून आम्ही दोघंही दचकलो.

गदगदा हसून एलिजाह म्हणाला,

'मूर्खांनो, तुमचं नशिबच फुटकं ! अजून तुम्हाला अक्कल आली नाही.'

'चल बाजूला हो !' मी ओरडलो, 'आम्ही पिकोंडवरून जलप्रवासाला जाण्याचा निश्चय केलाय्.'

एलिजाहचा स्वर एकदम केविलवाणा झाला. कळवळून तो म्हणाला,

'नका रे, जाऊनका !'

'पण का ?' मी संतापून ओरडलो.

'कॅप्टन अहबला तुम्ही अजून कुठं पाहिलं आहे. त्यानं तुम्हाला खरेदी केलंय् मूर्खांनो. रस काढण्यासाठी ऊसाचं कांड चरकात पिळतात, तसं तुम्हाला तो पिळल्याशिवाय राहणार नाही.'

केग तर घाबरून गेला. आकाशाकडं बघून हात फेकत तो ओरडला,

'योजोऽ योजोऽऽ '

'चूप बैस !' मी ओरडलो.

'कॅप्टन अहब तुम्हाला सोडणार नाही. त्यानं केवळ तुमचं शरीर विकत घेतलेलं नाही. तुमचा आत्माही आता त्याचाच झालाय्.'

एवढे शब्द बोलून एलिजाह बघता बघता धुक्यात दिसेनासा झाला.

घाबरलेला केग म्हणाला,

'इस्माईल- प्रवास नको- एलिजाह- योजो -'

केगची समजूत काढतांना माझा जीव हैराण झाला. कितीतरी वेळ केग नकारच देत होता.

शेवटी मात्र त्याची समजूत पटली.

पण आजही मला वाटतं. केगची समजूत मी घालायला नको होती. एलिजाहचं म्हणणं आम्ही मान्य करायला हवं होतं.

पण इतक्या उशिरा असा विचार करून काय उपयोग म्हणा !

धुक्याचे ढग चिरत आम्ही बंदरावर येऊन पोचलो.

समुद्राच्या पाण्यावर 'पिकोंड' जहाज मोठ्या डौलानं तरंगत होतं. त्याला पाहिल्यावर केग आणि मी बेहद्द खूष झालो. एलिजाहला आम्ही विसरलो.

त्या डौलदार जहाजानं आमच्या मनावर जणू जादू घातली होती.

उड्या मारतच आम्ही डेकवर आलो. आता धुकंही कमी झालं होतं. सूर्याचे किरण डेकवर पसरले. कॅप्टन पेलेग, बिल्हाड आणि सगळे खलाशी जमा झाले होतेच. पण मला कॅप्टन अहब कुठंच दिसला नाही. बहुधा तो त्याच्या केबिनमधे असावा.

'नांगर उचला.'

कॅप्टन पेलेगनं आज्ञा दिली. काही मिनिटातच आमचं 'पिकॉड' जहाज समुद्राच्या पाण्यावर धावायला लागलं.

मी अक्षरशः रोमांचित झालो. मनात उत्सुकता होती ती देवमाशाच्या शिकारीची !

***

## ३. कॅप्टन अहब

समुद्र एकदम शांत होता.

गुळगुळीत फरशीवर चेंडू घरंगळत पुढं जावा, त्याप्रमाणं संथ पाण्यावरून आमचं जहाज सुळकन् धावत होतं.

माझी तब्येत खूष होती. दोन्ही हात खिशात घालून मी शीळ घालत डेकवर उभा होतो.

एवढ्यात कुणीतरी मागून मला सणसणीत लाथ घातली. तोल जाऊन मी धपकन् तोंडावर पडलो. सगळे खलाशी फिदीफिदी हसायला लागले.

संतापानं मी ताडकन् उभा राहिलो. बघतो तो माझ्यासमोर कॅप्टन पेलेग उभा होता. दोन्ही हात कमरेवर ठेवून.

'मी तुला लाथ कशासाठी घातली असेल ?' त्यानं अगदी शांतपणे विचारलं.

मी पार गोंधळून गेलो. उत्तर सुचलंच नाही. पेलेग म्हणाला,

'पोरा, लक्षात ठेव. जहाजावर काम करतांना आणि जहाजानं बंदर सोडतांना कधीही खिशात हात घालून उभं राहायचं नाही.'

मग इतर खलाशांकडं वळून तो म्हणाला,

'आणि तुम्ही रे माकडांनो- हा नवीन पोऱ्या जहाजावर आला. त्याला एवढी साधी गोष्ट सांगायचं तुम्हाला सुचलं नाही ?'

आता मात्र मी सुध्दा हसत सुटलो. स्वतःची फजितीही आपल्याला केव्हातरी हसवते तर ! पेलेगही हसायला लागला---

--- किनारा सोडून दोन दिवस झाले. मला अजूनही कॅप्टन अहबचं दर्शन झालं

नव्हतं. मला नवल वाटे की त्याची केबिन सोडून तो बाहेर का येत नाही.

कसा असेल हा कॅप्टन अहब ?

नेव्हीत असलेल्या सरकारी अधिकाऱ्यासारखा का या खलाशांसारखाच ओबडधोबड ? रापलेला आणि खडबडीत ?

या दोन दिवसात अनेक गोष्टी माझ्या लक्षात आल्या. कॅप्टन पेलेग आणि कॅप्टन बिल्हाड यांच्या अनुभवाचा जहाजाला खूपच उपयोग होत होता.

पण जहाजावरच्या उलाढाली करणारी माणसं वेगळीच होती.

एक होता कॅप्टन स्टारबक. नेव्हीतून निवृत झालेला हा देखणा मनुष्य शिकारीत तरबेज होता. समुद्राची आणि हवेची जाण त्याला चांगली होती. या गोष्टीतला सूक्ष्म बदलही त्याच्या लक्षात येत असे.

दुसरा होता स्टब. कॅप्टन स्टारबकच्या हाताखाली तो चांगलाच तरबेज झाला होता.

तिसरा होता फ्लास्क. माशाच्या चपळाईनं तो सगळ्या डेकवर फिरायचा. जहाजाच्या कानाकोपऱ्यात असलेल्या प्रत्येक वस्तूची त्याला माहिती होती.

या तीन माणसांच्या हालचालीवर जहाजाचा कारभार चालत होता.

भालाफेक करणारे निवडक खलाशीही कॅप्टन पेलेगनं जहाजावर घेतलेले होते.

त्यांच्यापैकी एकजण निग्रो होता. एखाद्या राक्षसानंही लाजून मान खाली घालावी असा त्याच्या देहाचा आकार होता.

पण शक्तीचं कोणतंही काम असो. तो चुटकीसरशी करत असे.

डॅगू या नावाचा आणखी एक प्रख्यात भालाफेक करणारा खलाशी होता. बुटका आणि स्थूल. पण खूपच अनुभव असलेला. या ओबडधोबड माणसाचं बोलणं मात्र खूपच गोड होतं. वागायलाही तो इतका चांगला होता की जहाजावर तो सगळ्यांना हवासा वाटत असे.

केगनंही सगळ्यांची मनं जिंकून घेतली होती.

पण भालाफेक करण्यात सगळ्यात अनुभवी म्हणजे तॅश्तेगो होता. इतर खलाशी गंमतीनं म्हणायचे,

'एकवेळ देवमाशाची जागा चुकेल. पण तॅश्तेगोच्या भाल्याची फेक चुकायची नाही.'

समुद्रात येऊन काही दिवस लोटले होते. उत्तरेकडून आम्ही दक्षिणेकडं प्रवास करत होतो. अजून कॅप्टन अहबचं दर्शन झालं नव्हतं.

तो जणू केबिनमधे कैदीच होता.

हवेतला गारवा अजून कमी झाला नव्हता. कॅप्टन पेलेग म्हणायचा,

'विषववृत्त ओलांडलं की मग बघा- हा समुद्र कसा उबदार होतो ते.'

पिकॉडनं किनारा सोडून किती दिवस लोटले, कुणास ठाऊक. एके दिवशी वारा अनुकूल होता, म्हणून मी शिडाचे दोर भराभरा सोडत होतो.

अचानक माझी नजर क्वार्टर डेककडं गेली- आणि क्षणभर माझ्या श्वासच थांबला.

क्वार्टर डेकवर कॅप्टन अहब उभा होता.

त्यानं अंगावर काळा कोट पांघरलेला होता. कॅप्टन उंची आणि त्याचे रूंद खांदे नजरेत भरले. एखाद्या धातूचा पुतळा असावा, त्याप्रमाणं कॅप्टन अहब उभा होता.

मावळत्या सूर्याच्या प्रकाशात मला त्याचं स्वच्छ दर्शन झालं. अहबचं नाक लक्षात राहावं असं गरूडासारखं होतं. डोळे चांगलेच मोठे होते. एखाद्या सरळसोट उंच झाडासारखा तो ताडमाड उभा होता.

मला स्टारबकनं सांगितलं होतं,

'देवमाशानं अहबचा एक पाय खाल्ल्यावर दुसऱ्या एका देवमाशाच्या हाडाचा कृत्रिम पाय त्यानं बसवला आहे. तो पाय लाकडाचा नाही.'

जहाज सोडून अहबला बंदरावर आलेलंही कुणी पाहिलं नव्हतं. तो आणि त्याचं केबिन- पण आज तो क्वार्टर डेकवर उभा होता.

कॅप्टन अहब केबिनच्या बाहेर आल्यावर डेकवर एकदम शांतता पसरली. प्रत्येकाचं वाजणारं तोंड बंदच झालं. अहबच्या उपस्थितीची जरब इतक्या लांबूनही प्रत्येकाला जाणवत असावी.

एक अक्षरही न बोलता प्रत्येकजण आपापलं काम करत होता. प्रत्येकाच्या मनावर दडपण आलं होतं. थोड्या वेळानंतर कॅप्टन त्याच्या केबिनमधे गेला. दार बंद झालं.

स्टारबकनं सुटकेचा निःश्वास टाकला. त्याच्याबरोबर इतरांनीही.

मग ही गोष्ट दररोज घडायला लागली. एका ठराविक वेळेला कॅप्टन त्याच्या

केबिनमधून बाहेर यायचा आणि मावळत्या सूर्याच्या लालसर प्रकाशाखाली समुद्राच्या केशरी पाण्याकडं एकटक बघत उभा राहायचा.

सगळ्यांनाच आता हे पाठ झालं होतं.

आमच्या जहाजानं उत्तरेकडच्या समुद्राचा प्रवास संपवून विषववृत्त ओलांडलं. आणि पेलेग म्हणाला होता, तसंच झालं.

थंडी संपली. वातावरण प्रसन्न झालं. आम्ही उबदार समुद्रात प्रवेश केला.

एके दिवशी अचानक स्टारबकनं हुकूम दिला,

'चला. सगळेजण डेकवर गोळा व्हा.'

आम्ही सगळे डेकवर जमलो. कशासाठी बोलावलं आहे, याची उत्सुकता प्रत्येकाच्या मनात होती.

सगळे खलाशी कलकलाट करत होते. अचानक केबिनचं दार उघडलं आणि कॅप्टन अहब आला.

लख्ख उजेडात मी त्याला समोरून प्रथमच पाहिलं.

आणि माझ्या अंगावर सरसरून काटाच उभा राहिला. एलिजाह म्हणाला होता, तेच खरं. या माणसाच्या तावडीतून सुटका होणं अशक्यच.

डेकवर एकदम शांतता पसरली. कॅप्टन लंगडत आमच्यासमोर आला. देवमाशाच्या हाडाचा बसवलेला त्याचा कृत्रिम पाय टक् टक् वाजत होता.

आमच्यासमोर त्यानं फेऱ्या मारायला सुरवात केली. जणू आम्ही त्याच्या खिसगणतीतही नव्हतो.

इतरांचेच काय, पण अगदी स्टारबकचाही चेहरा पडलेला मला स्पष्ट दिसला. अचानक कॅप्टन आमच्याकडं वळून म्हणाला,

'तुम्हाला देवमासा दिसला, तर तुम्ही काय कराल ?'

कॅप्टन अहबच्या स्वरात अशी जरब होती की सगळ्यांचे पाय लटपटले. सुरवातीला उत्तर देण्याचं धाडस कुणालाच झालं नाही.

मग निग्रो हळूच म्हणाला,

'मी आनंदानं शीळ घालीन.'

'छान ! मग ?'

'मग काय ? होड्या पाण्यात सोडायच्या आणि देवमाशाचा पाठलाग करायचा !' स्टारबक ओरडला.

'गुड ! मग ?'

'मग काय ?', आम्ही सगळेच ओरडलो, 'आमचे भाले त्या देवमाशाच्या शरीरात घुसलेच म्हणून समजा.'

'उत्तम ! मग ?'

'मग काय ? देवमाशाचं धूड जहाजावर चढवायचं !'

'आणि देवमासा कुणाचा ?'

'तुमचा !'

कॅप्टन अहब जाम खूष झाला. कोटाच्या खिशात हात घालून त्यानं एक नाणं बाहेर काढलं.

सोळा डॉलर्सचं ते पिवळंधमक, सोनेरी नाणं सूर्यप्रकाशात लखलखत होतं.

आमचे डोळे विस्फारले.

कॅप्टननं धारदार सुरा घेऊन लाकडाच्या फळीत नाण्याच्या आकाराचं भोक पाडलं. हातोडा हातात घेऊन कॅप्टननं दणकन् ते नाणं त्या भोकात ठोकलं.

आमच्याकडं वळून तो म्हणाला,

'देवमाशाची पहिली वर्दी जो मला देईल, त्याला हे नाणं मिळेल.'

'हुर्रेऽऽ !' सगळेजण ओरडले.

देवमाशाच्या शिकारीची धुंदी सगळ्यांना चढली. कॅप्टन किती लबाड, चतुर आणि निर्दयी आहे, हे माझ्या लक्षात आलं होतं.

बोलता बोलता त्यानं खलाशांना ताब्यात घेतलं होतं.

'आपल्याला हवाय् तो पांढरा देवमासा. पांढरा ! समजलं ? मोठा, पांढरा, जहाजाएवढा देवमासा !'

कॅप्टननं हे शब्द उच्चारले मात्र, डेकवर पुन्हा शांतता पसरली. ही शिकार नेहमीसारखी नाही, हे प्रत्येकाला जाणवलं.

मग धाडस करून तॅश्तेगोनं विचारलं,

'कॅप्टन-- तुम्ही-- तुम्ही-- मॉबी डिकबद्दल बोलताय ?'

कॅप्टनच्या चेहऱ्यावर आश्चर्य दाटलं. तो म्हणाला,

'तुला मॉबी डिक माहीत आहे तर !'

'होय ! तो मासा भयंकर आहे. त्याच्या डोक्यातून उडणारा पाण्याचा फवारा आभाळाला लागतो.'

'आणि त्याच्या पाठीत कितीही भाले मारले, तरी त्याला इजा होत नाही,' डॅगू ओरडला.

कॅप्टन संतापला. प्रक्षोभानं त्याचं शरीर थरथर कापायला लागलं. एकदम तो किंचाळला,

'होय, तोच मॉबी डिक- तोच हवाय मला. तोच-तोच मॉबी डिक — तोच राक्षस.'

'पण कॅप्टन त्यानं तर तुमचा एक पायही कातरून खाल्ला.' स्टारबक म्हणाला. आपण नको ते बोललो, याची जाणीव त्याच्या मनाला झाली.

कॅप्टनच्या डोळ्यात रक्त उतरलं. त्याचा चेहरा आणखीनच भयंकर दिसायला लागला. त्याच्या चेहऱ्यावरचा तो खरखरीत ओरखडा- अरे बापरे !

'बरं झालं- त्यानं माझा पाय कातरला. पण आता मी त्याला सोडत नाही. सात समुद्राच्या कुठल्याही पाण्यात तो लपून बसलेला असला, तरी मी त्याला सोडणार नाही. - मॉबी डिक, आता तुझी शंभर वर्ष भरलीच म्हणून समज !'

पुन्हा एकदा कॅप्टनच्या शब्दांनी जादू केली आणि आम्ही ओरडलो,

'हुर्रेऽऽ !'

'जे शूर आहेत, त्यांनीच माझ्याबरोबर यावं, ' 'कॅप्टन गरजला, 'भ्याडांचं हे काम नव्हे. कोण आहेत भित्री मंडळी ? चला- आत्ताच त्यांनी समुद्रात उड्या माराव्यात.'

कॅप्टनची ही युक्ती होती.

स्टारबक पुढं येत म्हणाला,

'इथं कोण भित्रं आहे ? देवमाशाची शिकार करतांना जिंदगी संपत आली. मॉबी डिकला खतम करू आम्ही.'

'हुर्रेऽऽ !' पुन्हा एकदा आवाज घुमला.

'शाब्बास ! डोळे उघडून वावरा. देवमासा प्रथम ज्याला दिसेल, त्याला हे सोन्याचं नाणं मिळेल. आणि- मॉबी डिकची शिकार झाली की सोन्याच्या नाण्यात तुम्हाला आंघोळ घालीन मी.'

'हुर्रेऽऽ !'

सगळ्यांच्या आवाजात आवाज मिळवून मी सुध्दा जोरात ओरडलो खरा-पण माझ्या आवाजात जोश नव्हता. मॉबी डिकचं सावटमाझ्या मनावर उतरलं होतं.

मॉबी डिक हा प्रचंडहोता. त्या देवमाशाला अनेकांनी पाहिलं होतं. पण शिकार

करण्याची कुणाची हिंमतही झाली नव्हती.

मोठा धूर्त मासा होता तो.

कुणाला तो उत्तरेकडच्या समुद्रात दिसला होता, तर कुणाला दक्षिणेकडच्या. गुंगारा देण्यात तर तो इतका प्रवीण होता की अनुभवी खलाशीही त्याच्यापुढं हताश होत असत.

एकीकडं मॉबी डिकची शिकार करण्यासाठी आमच्या जहाजावरचा प्रत्येकजण उत्सुक झाला होता.

पण त्याचबरोबर भीतीचं दडपणही प्रत्येकाच्या मनावर खरोखरच आलं होतं.

आणि कॅप्टन अहब तर मॉबी डिकला विसरणं शक्यच नव्हतं.

आतापर्यंत कॅप्टन अहब आणि मॉबी डिक यांच्या पहिल्या झुंजीची कहाणी मला खलाशांकडून पूर्णपणे समजली होती.

त्या राक्षसी माशानं अहबचं पहिलं जहाज एखाद्या खेळण्याप्रमाणं हवेत उडवलं होतं.

जहाजाबरोबर छोट्या होड्यांचा तर धुव्वा उडाला. अहबच्या दोन मित्रांना त्याच्या डोळ्यापुढंच मॉबी डिकनं गिळलं.

चिडलेल्या आणि बेफाम झालेल्या अहबनं देवमाशावर आक्रमण केलं. हातातलं धारदार पातं त्यानं मॉबी डिकच्या पाठीत खुपसलं.

मॉबी डिकनं क्षणार्धात अहबला हवेत भिरकावून दिलं.

खाली येणारा अहब सरळ देवमाशाच्या तोंडातच जायचा. पण कमरेला बांधलेल्या दोरामुळं बाजूला खेचला गेला.

या गडबडीत अहबचा सगळा चेहरा फाटून गेला आणि त्याचा डावा पाय मांडीपर्यंत सरळ मॉबी डिकच्या तोंडात गेला.

दातानं काकडी तोडावी तसा प्रकार झाला. मॉबी डिकचे धारदार सुळे अहबच्या मांडीत घुसले. भीतीनं आणि वेदनेनं अहबनं किंकाळी फोडली.

पाण्यावर फेकल्या गेलेल्या अहबला स्वतःचा हिडीस देह दिसला. त्याचा डावा पाय नाहीसा झाला होता. पाणी रक्ताळलं होतं.

मॉबी डिकच्या त्या भयानक हल्ल्यातून अहब कसातरी वाचला.

जखमी अवस्थेत त्याला दुसऱ्या बोटीवर घेण्यात आलं, त्यावेळी वेदनेनं तो तळमळत होता. मॉबी डिकला शिव्या घालत होता.

देवमाशाची शिकार करण्याचा अहबचा लौकिक त्यादिवशी मॉबी डिकनं त्याचा पाय कातरून पार धुळीला मिळवला.

जहाज किनाऱ्यावर येईतोपर्यंत अहब पिसाटल्यासारखा करत होता.

त्याला आवरायला दहा-दहा माणसं लागायची. शेवटी जहाज किनाऱ्याला लागलं.

आणि जादूची कांडी फिरावी तसा बदल झाला. अहब शांत झाला. पण तेव्हापासून तो पार बदललाही.

त्याच्या आयुष्याची दिशा बदलली.

त्याला आता जगायचं होतं, ते फक्त सूड घेण्यासाठी. मॉबी डिकचा सूड घेण्यासाठी !

समुद्रावर जाणाऱ्या प्रत्येक जहाजाच्या कॅप्टनला त्यानं सूचना दिलेल्या होत्या. आणि त्यांना मॉबी डिक दिसला, अशी वार्ता मिळाली की स्वतःचं जहाज तो समुद्रात लोटत होता.

वर्षामागून वर्ष उलटली. पण कॅप्टन अहबच्या सूडाची धार कमी न होता प्रत्येक दिवसाला वाढतच गेली.

मॉबी डिक काही अजून त्याला गवसला नव्हता.

आणि आता आम्ही निघालो होतो. मॉबी डिकला शोधण्यासाठी.

खरं सांगतो- माझी तर झोपच उडाली होती.

आणखी काही दिवस उलटले. एके दिवशी दुपारी जेवण करून सुस्तावलेले खलाशी गप्पा मारत खिदळत पडले होते.

एवढ्यात जहाजावरील कावळ्याच्या घरट्यातून टेहळणी करणाऱ्या खलाशानं आरोळी दिली,

'देवमासा ! देवमासा ! --- माय गॉड ! दोन देवमासे आहेत.'

कॅप्टनच्या केबिनचं दार फटकन् उघडलं आणि अहब बाहेर आला तो ओरडतच.

'सगळे खलाशी- डेकवर चला.- होड्या पाण्यात सोडा. चला- हरी अप्ऽ !'

दोराला बांधलेल्या होड्या झपाट्यानं पाण्यात सोडण्यात आल्या. मी उत्सुकतेनं पाहिलं- पाण्यात देवमाशाच्या शुभ्र पाठी स्पष्ट दिसत होत्या.

आम्ही भराभरा होड्यात उतरलो.

'होड्या स्वतंत्र करा !,' अहब गरजला, 'स्टारबक - फ्लास्क, स्टब - क्विक - चला, एकदम जल्दी करा.

कॅप्टनच्या आज्ञेबरोबर होड्या ताबडतोब पाण्यात सोडण्यात आल्या. आम्ही सगळे खलाशी विभागून नावात बसलो. पाण्यावर वल्ही झप्‌झप् वाजायला लागली.

जहाजावरच्या कावळ्याच्या घरट्यातून फेदल्ला ओरडतच होता. देवमासे कुठे आहेत त्याची दिशा आम्हाला दाखवत होता.

मी केगकडं पाहिलं. देवमाशाच्या शिकारीची धुंदी त्याच्या डोळ्यावर चढलेली होती. त्याच्या दंडाचे स्नायू दरारले होते.

डॅगू आणि तॅश्तेगो जोरजोरात ओरडत होते. या सगळ्या गोंधळात मी जरा बावचळलोच होतो. मी स्टारबककडं पाहिलं. तो अनुभवी आणि शहाणा मनुष्य मात्र अतिशय शांत होता.

केग आता पिसाटल्यासारखा किंचाळत होता,

'देवमासा ! देवमासा ! वल्हवा, जोरात वल्हवा'

जहाज मागं टाकून आम्ही आता खूपच पुढे आलो होतो. मी मागं वळून पाहिलं. जहाजावरचा फेदल्ला अजूनही ओरडत होता. त्याच्या हालचालीवरून माझ्या ते लक्षात आलं. पण त्याचा आवाज मात्र आता आम्हाला ऐकू येत नव्हता.

माझ्या होडीमधे स्टब होता. त्यानं माझ्या खांद्यावर थोपटलं आणि तो म्हणाला, 'पोरा, पाहिलंस का ? आभाळ एकदम भरून आलंय्. आता बहुधा पाऊस कोसळणार.'

इतक्यात माझं लक्ष समोर गेलं. समुद्राच्या पाण्याखाली दोन देवमाशांच्या पाठी चांदीसारख्या दिसत होत्या.

माझ्या मनावर एकदम दडपण आलं. पण त्याचक्षणी मी जोरात ओरडलो,

'देवमासे !'

होड्या झप्‌झप् देवमाशांकडे निघाल्या. पण अवघ्या दोन मिनिटात सगळं वातावरण गढूळलं. समुद्र उसळला. आभाळात ढग जमले. उसळत्या लाटाखाली आमच्या होड्या इकडं तिकडं फेकल्या जाऊ लागल्या.

तशाही परिस्थितीत आम्ही जिद्द सोडली नव्हती. पण त्या उसळत्या पाण्यात आता देवमासे जणू अदृश्य झाले होते. आता काय करायचं ?

आणि एवढ्यात काहीतरी अद्भुत घडलं. तो प्रसंग मी आयुष्यात कधीही विसरणार नाही.

आमच्या दोन होड्यांच्या खाली हालणाऱ्या पाण्यात एक प्रचंड देवमासा आलेला होता. माझ्या पायाचं जणू बर्फ झालं. स्टबचा चेहरा विदीर्ण झाला. हातात भाला घेतलेला केग तर आ वासून बघत बसला.

पुढच्याच क्षणी देवमाशानं दणका दिला. आमच्या दोन- चार- पाच होड्या त्यानं खेळण्याप्रमाणं पाण्यावरून भिरकटून दिल्या.

आम्ही सगळे हवेत फेकले गेलो. मी देवाचं नाव घेतलं. खलास ! आता यातून वाचणं शक्य नाही.

मला पाण्याच्या बाहेर यायला किती वेळ लागला कोणास ठाऊक. पण पाण्याबाहेर येण्यापूर्वी खारट आणि कडवट पाण्याचे पाच-दहा घुटके तरी मी गिळले होते.

माझ्या तोंडावर उसळलेल्या पाण्याच्या लाटा बडवत होत्या. आमच्या होड्यातला एकहि मनुष्य मला आसपास दिसला नाही. बहुधा या चांडाळानं सगळ्यांना गिळलं. म्हणजे आता आपल्यालाही — !

यावेळी मात्र मला भीती न वाटता संताप आला. लाटांबरोबर मी झगडतच होतो. इतक्यात केगचा आवाज माझ्या कानावर आला. देवमाशांना शिव्या घालत उलटी झालेली होडी तो सरळ करण्याचा प्रयत्न करत होता.

जमिनीतून कावळ्याच्या छत्र्या उगवाव्यात तसे पाण्याबाहेर मला एकेकाचे चेहरे दिसायला लागले. मी एक़दम सुटकेचा निःश्वास टाकला. देवमाशानं उडवलेल्या होड्या फार लांब नव्हत्या.

केग, डॅगू, तॅश्तॅगो यांनी त्या होड्या सरळ केल्या. तरीसुध्दा होड्यात काही पाणी साठलेलंच होतं. एकमेकांना मदतीचा हात देऊन आम्ही कसेबसे होड्यात चढलो.

'होड्या जहाजाकडे वळवा,' स्टारबकनं आज्ञा दिली.

पाण्यात होतो तोपर्यंत मला भीती वाटली नव्हती. पण होडीत बसल्यावर मात्र मला असुरक्षित वाटायला लागलं. न जाणो, पुन्हा एखादा देवमासा आला तर !

कॅप्टन अहबचा डावा पाय मॉबी डिक नामक राक्षसी देवमाशानं कसा कातरून खाल्ला असेल याचं चित्र माझ्या डोळ्यापुढं आलं.

जहाजावर येईतोपर्यंत मलाही डावा पाय नाही असं उगीचच राहून राहून वाटत होतं.

डेकवर मी डोकं दोन्ही हातात धरून बसलो. माझ्या खांद्यावर स्टारबकनं थोपटलं. तो म्हणाला,

'काय रे पोरा, घाबरलास काय ?'

'छे !' मी उत्तरलो. मग मी म्हणालो, 'पण देवमासा होड्या सहज उचलून फेकतो हे आजपर्यंत ऐकलं होतं. आज त्याचा अनुभव घेतला.'

स्टारबक हसला. म्हणाला,

'पोरा, होड्याच काय पण मोठं जहाज सुध्दा देवमासा असं फेकून देऊ शकतो. अजून काय पाहिलस तू ? ही तर सुरवात आहे.'

ही तर सुरवात आहे ! माझ्या अंगावर सरसर काटा आला. भविष्यात काय लिहून ठेवलंय् कुणास ठाऊक ! अहबच्या नादापायी इतक्या खोलवर समुद्रात आलो खरा. पण पुढं काय ?

अचानक मला जाणवलं. शिकाऱ्यापुढं दोनच पर्याय असतात.

चिकाटीनं शिकार तरी करायची ! नाहीतर शेवटी स्वतःच शिकार व्हायचं !

***

म. ग्रं. म. ठा.
बाल
दा. क्र. २८८९
विषय बा.-बा.

## ४. पहिली शिकार

ढगाळ हवेतच आमचा प्रवास पुढं सुरू झाला. काही आठवडे लोटले.

अॅझोरेस ही प्रख्यात जागा मागं टाकून आम्ही पुढं सरकलो. केप व्हेर्ड या बेटाला वळसा घालून आम्ही ला प्लॅटा इथं येऊन पोहोचलो.

प्रवासात दोन भयाण वादळांना आम्हाला तोंड द्यायला लागलं होतं. अजून एकही देवमासा आम्हाला गवसला नव्हता. पण देवमाशाच्या दिव्यातून आम्ही गेलो होतो.

शुक्ल पक्ष होता. चंद्राच्या प्रकाशाखाली चांदीचं रूप घेतलेला समुद्र फेसाळत होता.

मध्यरात्रीची वेळ असावी. दिवसभर काम करून दमलेले बहुतेक खलाशी झोपले होते. मी डेकवर पेंगत बसलो होतो.

कानावर आवाज येत होता, तो फक्त फेसाळणाऱ्या समुद्राचा. अचानक फेदल्लाची किंकाळी घुमली.

'देवमासा !'

मी दचकलोच. या फेदल्लाला काय वेड लागलंय् काय ? देवमासा झाला म्हणून काय झालं ? कोणताही खलाशी रात्री माशाची शिकार करत नाही.

केबिनचं दार उघडून अहब किंचाळतच बाहेर आला,

'चला ! होड्या पाण्यात सोडा.'

आता ? यावेळी ? या लोकांना वेड लागलंय्.

पण कॅप्टनची आज्ञा. आम्ही होड्या पाण्यात लोटल्या. पण याहीवेळी

देवमाशानं आम्हाला गुंगारा दिलाच.

निराश मनानं आम्ही जहाजावर परतलो.

हेच नाटक काही दिवसांनी पुन्हा घडलं. देवमासा आम्हाला जणू गुंगारा देत होता. शरीरानं आणि मनानं दमलेल्या अवस्थेत आम्ही केप ऑफ गुडहोप या ठिकाणी येऊन पोहोचलो. वाटेत झालेल्या वादळात आमचं जहाज बुडता बुडता वाचलं.

केप ऑफ गुडहोप वरून आम्ही जरा पुढं सरकलो आणि क्रॉझेट या ठिकाणी येऊन पोहोचलो.

याठिकाणी कित्येक महिन्यानंतर एक जहाज दिसलं. त्या जहाजाचं नाव होतं अल्बॅट्रॉस. जहाजाजवळ पोचल्यानंतर कॅप्टन अहब त्याच्या केबिनमधून बाहेर आला. आणि त्यानं समोरच्या जहाजावरील कॅप्टनला विचारलं,

'तुम्हाला मोठा देवमासा दिसला का ?'

त्या कॅप्टननं नकारार्थी मान हलवली. अहब म्हणाला,

'माझ्या जहाजाचं नाव पिकॉड आहे. आम्ही पृथ्वी- प्रदक्षिणेला निघालो आहोत. तीन वर्षात आम्ही जर अमेरिकेला परतलो नाही तर आमचा शोध घ्या !'

अहबचे ते शब्द ऐकून सगळ्या खलाशांनी एकमेकांकडं पाहिलं. स्टारबक हसला. त्याच्या हसण्याचा अर्थ स्पष्ट होता. एकतर मॉबी डिकची तरी शिकार नाहीतर आमची तरी.

प्रवास करत करत आम्ही जावा बेटाजवळ आलो. आता फेदल्लाची जागा कावळ्याच्या घरट्यामधे डॅगूनं घेतलेली होती. खोल पाण्यातून आमचा प्रवास चालूच होता.

एके दिवशी उजाडतीलाच डॅगूला देवमासा दिसला. आम्ही अतिशय वेगानं होड्या पाण्यात घातल्या. पण सावधपणानं देवमाशाजवळ पोहोचलो.

होड्या जवळ पोहोचल्यावर हातातला भाला खाली टाकून केग खो खो हसत सुटला. स्टारबकनं पाहिलं-पाण्याखाली एक मोठा ऑक्टोपस होता.

स्टारबक खलाशांकडं वळून म्हणाला,

'सगळ्यांची डोकी फिरली आहेत. शिकार करायची आहे सिंहाची आणि हाती येतोय् कोल्हा.'

पण खलाशांनी अगदी चंग बांधला होता. ऑक्टोपस तर ऑक्टोपस. भराभरा

भाले सुटले आणि होड्यांभोवतीचं पाणी लालबुंद झालं. ऑक्टोपसला खलाशांनी पाण्यातून ओढून बाहेर काढलं आणि आम्ही होड्या मागं वळवल्या. इतक्यात चमत्कार घडला.

आमच्या समोरच्या पाण्यातूनच एका प्रचंड देवमाशानं त्याचा जबडा बाहेर काढला. मला तर तो एखाद्या प्रचंड हिमनगासारखा दिसला.

तॅश्तेगो किंचाळला,

'सांभाळा. ही शिकार घालवू नका.'

पण त्याचे शब्द पुरे होण्यापूर्वीच स्टबच्या हातातून भाला सुटलाही. देवमाशाच्या मानेखालच्या मांसल भागात तो सपकन् घुसला. रक्ताची चिळकांडी उडाली आणि क्षणार्धात सगळेजण त्या देवमाशावर तुटून पडले. आरोळ्या, किंचाळ्या यांनी आभाळ भरून गेलं.

तो प्रचंड प्राणी आमच्या तडाख्यातून सुटण्याची धडपड करीत होता. पण भाल्यानं बांधलेले दोर पक्के होते.

स्टब आता अगदी माशाजवळ पोचला होता. त्या अनुभवी खलाशानं देवमाशावर निर्दयपणाने लागोपाठ सपासप घाव घातले.

देवमाशाची धडपड थांबली. त्याचे निर्जिव कलेवर पाण्यावर उलटं झालं. धारदार दात दाखवणारा जबडा त्यानं वासला.

विजयाच्या ओरोळ्यांनी आभाळ भरून गेलं.

पण आता घाम काढणारं काम आमच्यापुढं उभं होतं.

काही टन वजन असलेला तो मासा जहाजात चढवणं म्हणजे दिव्य होतं. काही तासाच्या प्रयत्नानंतर आम्ही त्या देवमाशाला जहाजाजवळ आणला. डेकवरूनच कॅप्टन अहबनं त्या माशावर फक्त एक नजर टाकली आणि तो काही न बोलता केबिनमधे निघून गेला.

हा मॉबी डिक नव्हे हे मला तत्क्षणी उमगलं.

त्या देवमाशाचं धूड जहाजावर ओढून घ्यायला आम्हाला काही महिने लागले. काही टनांचं ते धूड उचलताना पिकॉड एका बाजूला कलंडणार आणि बुडणार असं सारखं आम्हाला वाटत होतं.

देवमासा डेकवर आल्यावर त्याला फाडायचं काम आमच्याकडे होतं. याबाबतीत स्टब जाणकार होता. दुधारी पात्याची तलवार घेऊन प्रथम स्टबनं त्याचं

मस्तक तोडलं. मग जबडा फाडला.

त्या देवमासाच्या जबड्यातून स्टबनं मोजून बेचाळीस लांबलचक धारदार दात बाहेर काढले.

देवमाशाचं सगळं शरीर फाडण्यात आलं. त्याच्या शरीरातली सगळी हाडं लाकडांचा ढिगारा रचावा तशी डेकवर ठेवण्यात आली.

स्टबचं कौशल्य अजब होतं. देवमाशाचा मेंदू त्यानं कौशल्यानं बाहेर काढला.

देवमाशाच्या चरबीचं वजन प्रचंड होतं. सगळी चरबी बाहेर काढण्यात आली. चरबीचं तेलही  भरून घेण्यात आलं.

'उरलेली घाण समुद्रात फेकून द्या.' स्टारबकनं ओरडून सांगितलं.

आम्ही डेक स्वच्छ करायला लागलो. पण त्यालाही कित्येक तास लागले. माशांची शिकार मला नवी नव्हती. पण देवमाशाच्या शिकारीनं मला एक अजब अनुभव दिला.

देवमाशाचे दात, चरबी, हाडं, कातडं, जीभ, तेल यासगळ्यांची भरपूर किंमत आम्हाला मिळणार होती. अर्थात् जिवंतपणे जमिनीवर पोचलो तरच !

पण आता दैव आमच्या बाजूला असावं. कारण लवकरच आणखी एका देवमाशाची आम्ही शिकार केली.

पुन्हा तेच काम ! पण गेल्या खेपेपेक्षा या माशाला हलवणं आणखी अवघड होतं. कारण हा देवमासा आणखीच मोठा होता.

या देवमाशाला जहाजावर चढवणं केवळ अशक्य आहे, हे आमच्या लक्षात आलं. इतका अनुभवी कॅप्टन अहब, पण त्याचंही डोकं चालेना.

अशा वेळी एकच उपाय असतो, आणि तो म्हणजे जहाजाच्या एका बाजूला देवमाशाचं डोकं तोडून दोराच्या सहाय्यानं लटकवत ठेवायचं आणि उरलेल्या देहातून आवश्यक त्या वस्तू काढून घ्यायच्या.

लटकत ठेवलेल्या डोक्याचाही उपयोग करण्यासाठी  जहाजावरच्या अनुभवी माणसाला दोराच्या सहाय्यानं त्या देवमाशाच्या डोक्यावर उतरवतात.

आम्ही ही कामगिरी तॅश्तेगोवर सोपवली. दोराच्या सहाय्यानं कसरत करत तॅश्तेगो त्या देवमाशाच्या डोक्यावर उतरला.

देवमाशाचं सगळं अंग सुळसुळीत असतं. त्यामुळं बिचाऱ्या तॅश्तेगोची सर्कस चालू होती. पाण्यावर जहाज हलत असल्यामुळं देवमाशाचं टांगलेलं डोकंही हलत

राहात होतं.

कशाचाही आधार नसलेला तॅश्तेगो बिचारा त्या डोक्यावर स्वतःचा तोल सावरत उभा होता आणि तशाही अवघड परिस्थितीत तो देवमाशाचा मेंदू पोखरून त्यातून चरबी आणि तेल बाहेर काढत होता.

अचानक दर्यानं त्याचं उग्र स्वरूप दाखवलं. तॅश्तेगोची भयानक पंचाईत झाली. त्याला वर घेण्यासाठी आम्ही खाली दोर टाकायला लागलो आणि घोटाळा झाला.

तॅश्तेगोनं आम्ही खाली टाकलेला दोर पकडण्याचा प्रयत्न केला आणि त्याचा तोल गेला. आम्हाला वाटलं की तो आता समुद्रात पडणार.

पण प्रत्यक्षात मात्र उलटच घडलं.

तॅश्तेगोनं देवमाशाच्या डोक्याचा मेंदू पोखरून मोठं भोक तयार केलं होतं. भोक कसलं म्हणा, मोठं विवरच तयार झालं होतं. खोल, उभं !

पाय घसरलेला तॅश्तेगो सरळ त्या उभ्या भोकात पडला. त्या अरूंद चिंचोळ्या भोकाची उंची अशी तयार झाली होती की, त्यातून बाहेर पडणं, हे तॅश्तेगोला केवळ अशक्य होतं.

त्याचा श्वास गुदमरला. भयानं त्यानं किंकाळ्या फोडायला सुरवात केली.

त्यातून तॅश्तेगोची सुटका करणं केवळ अशक्य होतं.

इतक्यात भलतंच घडलं. बरेच दिवस देवमाशाचं डोकं टांगत ठेवलेलं असल्यामुळं जहाजाच्या दोऱ्या कचल्या असाव्यात.

तॅश्तेगोच्या धडपडीमुळं दोरांना हिसके बसले आणि कचलेले दोर तुटले. देवमाशाच्या डोक्याचं ते प्रचंड धूड क्षणार्धात धाडकन् पाण्यात कोसळलं.

भीतीनं मी शहारलो. तॅश्तेगो अगोदरच देवमाशाच्या मेंदूत अडकला होता. आता तर त्या भोकात पाणी शिरणार आणि तॅश्तेगो गुदमरून मरणार.

डेकवर प्रत्येकाची अवस्था माझ्यासारखीच झाली होती.

पण यावेळी केग काय वल्ली आहे, हे सगळ्यांच्या लक्षात आलं.

क्षणार्धात त्यानं विजेच्या चपळाईनं हालचाल केली. डेकवरची दुधारी पात्याची तलवार उचलून केगनं समुद्राच्या पाण्यात सूर मारला.

माझी छाती धडधडली.

काही सेकंद-- का काही मिनिटं ?--तशीच गेली. डेकवरचा प्रत्येक मनुष्य

अवाक् झालेला होता. माझ्या जवळच उभ्या असलेल्या डॅगूची छाती धडधडते आहे, हे मला स्पष्ट जाणवत होतं.

अचानक केगचं तुळतुळीत डोकं पाण्यावर चमकलं. त्याच्या बळकट हातामधे आम्हाला लगेच दिसला तो बेशुध्द झालेला तॅश्तेगो !

भानावर आलेल्या स्टारबकनं आता ताबडतोब हुकूम देण्यास सुरवात केली. भराभरा डेकवरून दोर सुटले. खलाशी दोरावरून झपाझप खाली उतरले.

काही मिनिटातच केग आणि तॅश्तेगो यांना डेकवर घेण्यात आलं.

ब्लँकेटमधे गुंडाळून बेशुध्द तॅश्तेगोला केबिनमधे नेण्यात आलं. तॅश्तेगो नक्कीच वाचणार, याबद्दल आमची खात्री झाली होती.

काय घडलं, त्याची चित्तरकथा आम्हाला प्रत्यक्ष केगकडूनच ऐकायला मिळाली. केगनं खरोखरच चमत्कार घडवला होता. केगच्या प्रचंड दमसासामुळं आणि राक्षसी ताकदीमुळचं तॅश्तेगो वाचला होता, यात शंकाच नाही.

पाण्यात सूर मारतानांच केगनं प्रचंड दमसास छातीत भरून घेतला आणि पाण्यात खोल जाणाऱ्या देवमाशाच्या डोक्याला त्यानं गाठलं. भोक पडलेल्या देवमाशाच्या मेंदूची एक बाजू ताकदीनं, तलवारीच्या धारेनं फाडून काढली.

मिळालेल्या खोबणीत हात घालून दंडाच्या ताकदीनं केगनं तॅश्तेगोला मृत्यूच्या जबड्यातून अक्षरशः ओढून बाहेर काढलं.

पाण्यातून बाहेर येईतोपर्यंत केगचा जीवही कासावीस झाला होता.

या सगळ्या वेळात तॅश्तेगोच्या पोटात भरपूर पाणी गेलं होतं.

केगनं केलेलं धाडस इतर कुणी केलं नसतं. पण केगनं अजिबात फुशारकी मारली नाही. जणू त्यानं काही विशेष केलंच नव्हतं.

तॅश्तेगोच्या पोटातलं पाणी बाहेर काढण्यात आलं. तॅश्तेगो वाचला. आपला जीव केगनं वाचवला, हे त्याला कळल्यावर त्यानं केगला जवळ बोलावलं आणि सगळ्यांच्या समोर केगच्या गुळगुळीत डोक्याचं चुंबन घेतलं.

'हुर्रेऽऽ !' आम्ही आनंदानं ओरडलो.

— तॅश्तेगोच्या जिवावरचं संकट टळलं आणि काही दिवसानंतर आम्हाला पुन्हा एकदा मॉबी डिकची आठवण झाली.

आमचं जहाज पाण्याचे तडाखे खात शेवटी जपानजवळ येऊन पोचलं.

मॉबी डिक लवकरात लवकर भेटावा, अशी आता प्रत्येकाची तीव्र इच्छा होती.

पण मॉबी डिकची भेट होण्याऐवजी आता आणखी एक घोटाळा झाला.

देवमाशांच्या तेलाची पिंप जहाजाच्या तळघरात ठेवलेली होती. त्यातली काही पिंप फुटली आणि त्या तेलाचे तवंग आमच्या जहाजाभोवतीच्या समुद्रात उतरले. आता एकच पळापळ झाली.

कारण देवमाशाच्या तेलाचा एकेक थेंब मोलाचा असतो.

अहबच्या हुकमावरून आम्ही तळघरात घुसलो आणि कुठलं पिंप फुटलं आहे, त्याचा शोध घेऊ लागलो. शेवटी फुटलेल्या काही पिंपांचा शोध लागला.

फुटलेल्या जागा गॅसवरजाळून त्या पिंपाच्या फुटलेल्या जागा भरून काढणं, हे पहिलं काम होतं. पण या शोधाला आणि फुटलेली पिंप दुरुस्त करायला चार-सहा दिवस गेले.

त्या जागेत काम करतांना मला मळमळायला लागलं होतं.

माझं सोडूनच द्या, पण केगसारखा प्रचंड माणूस सुध्दा जेरीला आला आणि शेवटी आजारी पडला.

केगला पिवळ्या तापानं गाठलं, त्याची प्रकृत्ती झपाट्यानं ढासळली.

या दुखण्यातून आपण आता वाचत नाही, याबद्दल त्याची खात्रीच पटली.

माझा हात घट्ट पकडून तो बडबडला,

'मी मेलो, म्हणजे तुम्ही मला समुद्रात टाकणार. मग एखादा देवमासाही मला चघळून खाऊन टाकेल.'

मी केगला धीर द्यायचो खरा, पण आता केग या दुखण्यातून वाचणं अवघड आहे, याबद्दल माझीही खात्री होऊ लागली होती.

एके दिवशी केगनं जहाजावरच्या सुताराला बोलावलं आणि तो म्हणाला,

'मला राहण्यासाठी एक छानसं घर तयार कर.'

केग काय म्हणतोय, ते प्रथम सुताराच्या लक्षात आलं नाही. त्याला वाटलं तापाच्या भरात केग काही तरी वेड्यासारखं बोलतोय.

पण केगला काय म्हणायचं होतं, ते मला अचूक कळलं होतं.

मी सुताराला जवळ बोलावून त्याच्या कानात काही गोष्टी सांगितल्या. तो सुतार हादरलाच. म्हणाला,

'काय ? शवपेटी ?'

होय ! केगच्या मनात तेच होतं.

त्यानं मला तसं सांगितलंही होतं,

'इस्माईल, मी या पिवळ्या तापातून उठत नाही. मी आता सुताराकडून एक शवपेटी तयार करून घेणार आहे. मला त्यात घाला. माझ्या योजोसकट. आणि किनाऱ्यावर गेल्यावर मला जमिनीत पुरा.'

केगला एकच भीती होती. आपण मेल्यावर अहब आपल्याला समुद्रात फेकणार.

माझ्या सांगण्यावरून सुतारानं एक झकासपैकी लांबलचक पेटी तयार केली. पण आश्चर्य म्हणजे पेटी तयार झालेल्या दिवसापासून केगची तब्बेत सुधारायला सुरवात झाली.

काही दिवसात त्याचा ताप पूर्ण उतरला आणि तो खडखडीत बरा झाला. अहबनं बोलून दाखवलं नाही, पण त्याच्याही खडबडीत चेहऱ्यावरचं आश्चर्य लपलं नाही.

मला तर हर्षवायूच झाला होता.

केग योजोच्या मूर्तीकडं बोट दाखवून मला म्हणाला,

'आमच्या या देवामुळं मी वाचलो.'

एरवी मी केगला हसलो असतो, पण आता माझाही त्याच्या म्हणण्यावर विश्वास बसला.

अजून आमची मॉबी डिकशी भेट झाली नव्हती. कॅप्टन अहब अस्वस्थ झाला होता.

आमचा प्रवास चालूच होता. एके दिवशी वाटेत आम्हाला 'रॅचेल' या नावाचं जहाज भेटलं.

या जहाजाचा कॅप्टन बुड्ढा होता. समुद्रावर दिवस काढून त्याचे केस पिकले होते, हे उघड होतं. अहबनं त्याला सलाम करून सरळंच विचारलं,

'तुम्हाला मोठा पांढरा देवमासा दिसला काय? चंदेरी-- मोठा-पांढरा देवमासा?'

'कोण? मॉबी डिक?' त्या म्हाताऱ्यानं अगदी सरळचं विचारलं.

'होय! तोच राक्षस! भेटला तुम्हाला?'

'नुसता भेटलाच काय, पण आम्ही त्याच्याशी झटापटही केली.'

'म्हणजे तुम्ही त्याला ठार मारलंत?' अहबनं उतावळेपणानं विचारलं.

'तो मासा अजिंक्य आहे. तो खरंच देवाचा मासा आहे.'

'हंऽऽ !'अहब तुच्छतेनं म्हणाला, 'मासा कुठं पाहिलात तेवढं सांगा.'

'सांगतो. पण मला तुमची मदत हवीय्.'

'कसली मदत ?'

'मॉबी डिकबरोबर आमची चांगलीच जोरदार झुंज झाली. आम्ही त्याला जखमी केला. पण आमच्या होड्या बुडवून आणि दोन चार माणसांना गिळून तो पळाला.'

'मग ?'

'थोडा घोटाळा झालाय्. माझ्याबरोबर आणखी एक छोटसं जहाज होतं. त्यात माझा तरूण पोरगा होता.'

'त्याचं काय ?'

'ऐका तर खरं ! भाल्याची फेक करण्यात त्याचा अगदी हातखंडा . मॉबी डिकवर त्यानं अचूक मारा केला. पण माशानं पळ काढल्यावर भाल्याला जोडलेले दोर तोडायला तो पार विसरला.'

'अच्छा !'

'माशाबरोबर माझा पोरगा कुठं फरकटत गेला असेल कुणास ठाऊक ! तुम्ही मला मदत करा. माझा पोरगा- देवाऽमला त्याचा शोध घ्यायचाय. मला मदत करा. तुमचे उपकार मी जन्मभर विसरणार नाही.'

एवढं बोलून तो म्हातारा कॅप्टन अक्षरशः लहान मुलाप्रमाणं रडायला लागला.

आम्हाला सर्वांना त्या म्हाताऱ्या कॅप्टनची अतिशय कणव आली. पण अहब मात्र निर्विकार होता. अतिशय थंड स्वरात त्यानं आम्हाला आज्ञा दिली,

'चला, शिडं उभारा. आपल्या प्रवासाला सुरवात करा. अजून बराच मोठा टप्पा गाठायचाय आपल्याला.'

अहबचे शब्द ऐकून आम्ही चकीतच झालो. तो म्हातारा कॅप्टन पुन्हा गयावया करून म्हणाला,

'मला मदत करा. हे तुमचे उपकार मी जन्मभर विसरणार नाही.'

'मला तुम्हाला मदत करायला अजिबात जमणार नाही. मला गाठायचंय ते मॉबी डिकला. त्याच्यापुढं इतरांचा विचार करायला मला वेळ नाही. मॉबी डिकचे काही जुने हिशेब मला चुकते करायचे आहेत.'

आमचा नाईलाज झाला. स्टारबकनं शिडं उभारण्याचा हुकूम दिला आणि आमचं जहाज पुढच्या प्रवासाला निघालं.

मागं वळून 'रॅचेल' जहाजाकडं मला बघवत नव्हतं. तो म्हातारा कॅप्टन अजूनही रडतच असला पाहिजे.

थोडा वेळ तसाच गेला. केग माझ्या खांद्याला स्पर्श करून म्हणाला,

'मागं बघ.'

मी मागं वळून पाहिलं. 'रॅचेल' ठिपक्याएवढं दिसत होतं. निराशा आणि दैन्य यांच्यात वेढलेल्या दुर्दैवी माणसाप्रमाणं मला ते वाटलं !

पण ते आमचंच तर प्रतीक नव्हतं ?

मी केबिनकडं वर नजर टाकली. कॅप्टन तिथं उभा होता. शांतपणे. पण कसल्या तरी विचारात हरवलेला होता तो.

आमच्या जहाजानं आता भूमध्यवृत्ताच्या कटिबंधात प्रवेश केला. इथं समुद्र शांत होता.

अजून मॉबी डिकची गाठ झाली नसली, तरी या शांत समुद्रात तो असण्याची शक्यता अधिक होती.

काही दिवस असेच गेले आणि आम्हाला आणखी एक जहाज भेटलं. त्या जहाजाचं नाव होतं 'डिलाईट'. म्हणजे आनंद.

पण जहाजाची दशा पाहिल्यावर त्या नावानं जहाजाला कुणी हाक मारण्याचा प्रयत्न केला नसता. सगळं जहाज चिराळलं होतं. लाटांनी तडाखा दिला, तर फळ्या निसटतील अशी त्याची अवस्था होती.

एका बाजूला जहाजाला मोठं भोक पडलं होतं. ते बुजवण्याचा प्रयत्न दमलेले खलाशी करत होते.

कॅप्टन अहबला त्याचं सोयरसुतक नव्हतं. त्यानं एकच प्रश्न विचारला,

'तुम्हाला मोठा देवमासा दिसला का ? रुपेरी, चंदेरी -- मॉबी डिक ?'

डिलाईट जहाजाचा कप्तान वेड्यासारखा हसला. म्हणाला,

'त्या देवमाशानं आमच्या जहाजाची कशी दशा केलीय् बघ. बघ- डोळे उघडून बघ-- '

'म्हणजे ? तुम्ही त्याला ठार केलंत ?'

'हॅऽऽ ! मॉबी डिकला कुणी मारणं कधीतरी शक्य आहे काय ?'

अहबनं आपल्या हातातले तीन धारदार भाले उंच धरले आणि तो किंचाळला,

'या भाल्यांनी मी मॉबी डिकची छाती फाडून टाकेन.'

'इतकं सोपं नाहीय् ते ! मॉबी डिकची भेट झाल्यावर कळेल ते ! हे माझे दोन खलाशी पाहिलेस ? यांना मॉबी डिकनं संपवलं. त्यांना मूठमाती देण्यासाठी आम्ही किनाऱ्याकडं निघालो आहोत.'

'आम्ही मॉबी डिकलाच मूठमाती देणार आहोत.'

'हाऽ ! हाऽ ! हाऽ ! मॉबी डिकला ? अशक्यच. माझे आणखी पाच खलाशी त्यानं त्याच्या फारोळ्या दाताखाली कातरून टाकले. तुझे सहकारी असे मेले, म्हणजे मगच तुला शहाणपण सुचेल.'

डेकवर आम्ही हादरलोच !

पण कॅप्टन अहबवर त्याचा काहीही परिणाम झाला नाही.

'शिडं उभारा !' त्याची आरोळी घुमली.

समोरच्या जहाजावरचा कॅप्टन गदगदा हसला. ओरडून म्हणाला,

'मॉबी डिक काय तुम्हाला सोडणाराय् ? तुझा एकही खलाशी सुटणार नाही त्याच्या तावडीतून. अजून जहाज मागं वळव. अजून--- तू मूर्ख आहेस. माझं ऐकणार नाहीसच म्हणा. --- तुझं जहाज मला आता शवपेटीसारखं दिसतंय ! हाऽ ! हाऽ ! हाऽ'

त्याच्या भेसूर हसण्यानं आमचा थरकाप झाला. केगचं काळीज हादरलं.

पाण्याचं पोट चिरत आमचं जहाज पुढं धावत होतं. आणि आम्ही सुन्नपणे डेकवर बसलो होतो.

त्या कॅप्टनचे शब्द माझ्या कानात घुमत होते,

'तुमचं जहाज मला शवपेटीसारखं दिसतंय--- शवपेटीसारखं--- शवपेटी ऽ'

***

## ५. मॉबी डिकच्या जबड्यात

भूमध्यवृत्ताजवळचा समुद्र मात्र अतिशय देखणा होता. निळंभोर अथांग पाणी. पाणीच पाणी. सूर्यप्रकाशात आणि चंद्रप्रकाशात हे पाणी चांदीसारखं चमचम करायचं.

आता हवेतला ऊष्मा वाढला होता. त्या उन्हात डेकवर काम करणारे खलाशी रापले होते.

हवेत ऊष्मा असला तरी अंगावर सतत गार वारं यायचं. या हवेवर कॅप्टन अहब खूष होता. मॉबी डिकची लवकरच गाठ पडणार याबद्दल त्याची खात्री झाली होती.

एके दिवशी तो खुषीत होता आणि डेकवर गप्पा मारत बसला होता.

'काय सुरेख हवा पडलीय् आणि समुद्राचं पाणी कसं चमचमतंय् बघा.'

कुणीच काही बोललं नाही. अर्थात उत्तराची अपेक्षा कॅप्टनला नव्हतीच. कॅप्टन पुढं बोलायला लागला. जणू तो फक्त स्वतःशीच बोलत होता.

'मी पहिला देवमासा मारला, त्यावेळी अशीच हवा होती. त्यावेळी मी फक्त अठरा वर्षांचा होतो. त्यावर आज चाळीस वर्षं उलटली. कसे गेले दिवस आणि किती झपाट्यानं ! स्टारबक, तुला माहीत आहे का ? या चाळीस वर्षांपैकी फक्त दोन-अडीच वर्षं मी जमिनीवर काढली असतील. बाकीचं माझं सगळं आयुष्य या समुद्राच्या पाण्यावर गेलं.

'आणि जहाजावर काय मिळणार ? मला कधी फळं खायला मिळाली नाहीत. ताजी भाजीही नाही. चांगला मऊ ब्रेड नाही. -- वाट्याला आलं ते फक्त खारवलेलं

मांस ! मासे, नाहीतर वाळलेली बिस्किटं --- '

'मी लग्न केलं नाही, ते बरंच झालं म्हणा ! नाहीतर बायकोचे काय हाल झाले असते -- सदान् कदा नवरा समुद्रावर असण्यापेक्षा विधवा असलेलं बरं !

'स्टारबक, माझी सगळी जिंदगी अशी गेलीय्. जहाज हेच माझं घर, कुटुंब, मालमत्ता -- सगळं काही. सालं हे काय आयुष्य आहे ?---

सगळे खलाशी चित्रासारखे स्तब्ध बसले होते. आपल्याच मस्तीत बोलणारा अहब एकदम भानावर आला. इतका वेळ भावविवश झालेला त्याचा आवाज एकदम थंड झाला. तो म्हणाला,

'पण आता काय त्याचं म्हणा ? मॉबी डिकला खलास करण्याची मी शपथ घेतलीय्. त्याला मी सोडणार नाही. स्टारबक - तू आणि तुझे सहकारी मला मदत करणार आहात !'

स्टारबकनं काहीही न बोलता मान हलवली. मला आश्चर्य वाटलं.

अहब वाटतोय् तसा दगडी पुतळा नाहीय्. त्याच्या काळजात कुठंतरी माणुसकीचा ओलावा आहे. तिथं आत दडलेला माणूस केव्हातरी असा बाहेर येतोय्. माझ्याही अंतःकरणाचा एक कोपरा कुठंतरी सुखावला.

बहुधा सगळ्या खलाशांची अगदी तशीच अवस्था होती.

मध्यरात्र झाली. चंद्रप्रकाशात समुद्र शांत पहुडला होता. अचानक मला कसला तरी वास आला. कसला हा वास ? कुणाच्या बरं अंगाला असला वास येतो ?

देवमासा ! देवमासा ! नक्कीच ! माझ्या मेंदूला अक्षरशः झिणझिण्या आल्या.

एवढ्यात केबिनचं दार धाडकन् उघडून कॅप्टन अहब बाहेर आला आणि अक्षरशः किंचाळला,

'मॉबी डिक ! मला- मला त्याचा वास येतोय्.'

डेकवर एकदम धावपळ झाली.

'मॉबी डिक ! मॉबी डिक !'

जाळ्यात बसून कॅप्टन अहब कावळ्याच्या घरट्यात गेला आणि तिथूनच ओरडला,

'तो बघा, तो बघा राक्षस - मॉबी डिक ! बघा त्याला - '

आम्ही सगळेजण डेकच्या कडेला धावलो आणि डोळे मोठे करून चंद्रप्रकाशात पाहायला लागलो.

देवाशप्पथ सांगतो - ते दृश्य माझ्या डोळ्यापुढून आयुष्यात हलणार नाही.

एखादं बेट असावं, तशा प्रचंड पाठीचा तो अजस्त्र देवमासा पाण्यातून पुढं सरकत होता.

डॅगूनं तोंड वासलं. केग तर एखाद्या पुतळ्यासारखा उभा होता.

'तो बघा राक्षस - पुढं जातोय्. बघा - ', कॅप्टन अहब ओरडतच होता.

तिथूनच तो हात फेकत होता. डोळे गरगरा फिरवत होता.

तॅश्तेगोनंही कॅप्टनच्या जोडीनंच मॉबी डिकला पाहिलं होतं. आता तोही कॅप्टनबरोबर ओरडायला लागला होता.

'मॉबी डिकला प्रथम कुणी पाहिलं ?,' कॅप्टन अहबनं ओरडून विचारलं.

'मी बघितलं !' तॅश्तेगो ओरडला, 'ते सोन्याचं नाणं आता माझं आहे.'

इतक्यात त्याचं लक्ष कॅप्टनकडं गेलं. आवंढा गिळून तो म्हणाला,

'कॅप्टन, आपण दोघांनीही त्याला एकदमच पाहिलं.'

कॅप्टन आता खुषीत आला होता. अत्यानंदानं तो ओरडला,

'बघताय काय ? चला, होड्या सोडा खाली आणि पाठलाग करा त्या राक्षसाचा.'

अजूनही बरेचसे खलाशी आऽ वासून त्या अजस्त्र देवमाशाला बघत होते.

सावध झालेल्या स्टारबकनं खलाशांच्या मदतीनं होड्या पाण्यात सोडल्या. आता प्रत्येकातला शिकारी जागा झाला. आश्चर्याची जागा आता धाडसानं घेतली.

होड्या अलगदपणे वल्हवत आम्ही त्या अजस्त्र माशाजवळ पोचलो.

आमची त्याला चाहूल लागलेली नसावी. अजूनही तो आपल्याच मस्तीत फिरत होता.

मी केगकडं पाहिलं. त्याच्या दंडाचे स्नायू टरारून फुगले होते. माझी नजर अहबकडं वळली.

त्याच्या डोळ्यात सूड उतरला होता आणि तो अक्षरशः पिसाटलेल्या वेड्यासारखा दिसत होता. मला कससंच झालं.

अतिशय सावधपणे आम्ही मॉबी डिकजवळ पोचलो.

स्टबनं खूण केल्याबरोबर भाले झपाझप सुटले आणि त्यापैकी तीन भाल्यांनी अचूक लक्ष्यवेध केला. तीन धारदार पाती मॉबी डिकच्या पाठीत घुसली.

आणि अद्भुत घडलं.

चिडलेला तो देवमासा एकदम उसळला. ते अजस्त्र धूड पाण्यातून झपकन् बाहेर उसळलं. आपल्या डोळ्यासमोर एखादी प्रचंड दगडी इमारत यावी, तसं आम्हाला झालं.

आमची नजर तर अक्षरशः फाटून गेली ! मी थक्क झालो. पुढच्याच क्षणी सुळकन् तो प्रचंड मासा पाण्याखाली दिसेनासा झाला.

त्याचा अजस्त्र देह पाहून मला भीती वाटली. मी भारल्यासारखा झालो होतो.

याचवेळी आमच्या डोक्यावर काही पक्षी गोळा होऊन कलकलाट करत होते.

खलाशांच्या दृष्टीनं तो मोठाच अपशकुन होता. पण --

इतक्यात तॅश्तेगो ओरडला,

'कॅप्टन, पक्षी गोळा झालेत वर ! फारच मोठा अपशकुन आहे हा. नकोऽ आता शिकार करायला नको, आपण बोटीवर परत जाऊ या.'

'अशक्य !', कॅप्टन अहब तारस्वरात किंचाळला, 'मला फसवणारा मॉबी डिक आता तावडीतून सुटता कामा नये !'

कॅप्टनचे शब्द पुरे होण्यापूर्वीच मॉबी डिक पुन्हा एकदा पाण्यातून वर उसळला.

यावेळचं त्याचं दर्शन मात्र काळजाचं पाणी पाणी करणारं होतं.

त्याचा प्रचंड जबडा वासलेला होता. जणू आम्हा सर्वांना गिळण्यासाठी. झुमकन् तो पुन्हा एकदा पाण्याखाली दिसेनासा झाला.

जबड्यातले सुळे त्यानं एकमेकांवर असे घासले की केगसारखा शूर वीरही लटपटला.

मॉबी डिकचं ते दर्शन पाहून कॅप्टन अहबही अक्षरशः थिजून गेला. हातातला भाला त्याच्या हातातच राहिला.

एक क्षणभर अवघं विश्व चित्रासारखं स्तब्ध होऊन गेलं. जे पाहिलं, ते भयंकराहून भयंकर होतं.

पण आमच्या थिजलेल्या विश्वाला मॉबी डिकनं पाण्याखालून जबरदस्त तडाखा दिला. आम्ही एकदम हवेत उडालो. होड्या कुठल्या कुठं भिरकवल्या गेल्या. पाण्यात आम्ही लाटांशी झगडायला लागलो आणि याच वेळी मॉबी डिकनं डोकं पाण्याबाहेर काढलं.

बापरे ! तो जणू थट्टेनं आम्हाला हसत असावा. भयाण जबडा विचकत तो आमच्या भोवती फेऱ्या मारायला लागला.

आता आम्ही सगळे त्याच्या जबड्यात जाणार होतो. आम्हाला कोणी वाचवायला येणं अशक्यच होतं.

पण जहाजावरच्या स्टारबकनं प्रसंगावधान दाखवलं आणि 'पिकॉड' जहाज त्यानं वेगानं आमच्या दिशेनं पुढं आणलं आणि मिळालेल्या जागेतून पुढं घुसवून त्यानं ते मॉबी डिक आणि आम्हा खलाशांच्यामधे उभं केलं.

जिवाच्या करारानं सगळे खलाशी भराभरा जहाजावर चढले.

स्टारबकच्या प्रसंगावधानामुळं खलाशांचे प्राण वाचले होते.

आम्ही पाहिलं- मॉबी डिक आमच्यापासून लांब गेला होता.

त्याच्या थयथयाटामुळं जहाजाभोवतीचं सगळं पाणी फेसाळलं होतं आणि मॉबी डिक ज्या दिशेला गेला, त्या दिशेला पाण्याच्या फेसाचा एक लांबलचक पट्टा उठला होता.

आम्ही सगळे जहाजावर चढल्यावर कॅप्टन अहबला शुध्द आली. त्यानं विचारलं,

'सगळे जहाजावर आले ? का कुणी मागं राहिलंय् ?'

सगळे खलाशी जहाजावर सुखरूप परतले आहेत, याची स्टारबकनं खात्री केली. खलाशी आता बरेचसे भानावर आले होते.

कॅप्टन अहब म्हणाला,

'गुड !--- एक लक्षात ठेवा -- या घातकी प्राण्यानं आपल्याला क्षणभर घाबरवलं असेल. पण आता त्याची सुटका नाही. आपले तीन भाले त्याच्या पाठीत घुसले आहेत.'

कुणीच काही बोललं नाही.

कॅप्टननं क्षणभर विसावा घेतला आणि केसातून तोंडावर ओघळणारं पाणी झटकून टाकत तो म्हणाला,

'सोळा डॉलर्सचं नाणं अजूनही तिथंच आहे. मॉबी डिकला मीच प्रथम पाहिलं - पण मी ते नाणं तिथून काढून घेतलेलं नाही --- अजूनही जो मॉबी डिकला बघेल, त्याला हे नाणं बक्षिस मिळेल.'

यावरही कुणी काहीच प्रतिक्रिया दाखवली नाही. एकेका शब्दावर जोर देत कॅप्टन म्हणाला,

'मॉबी डिकची तुम्ही जर शिकार केलीत, तर मी प्रत्येकाला पैशानं आंघोळ

घालेन.-- मी तुम्हाला पूर्वीच वचन दिलं आहे आणि मी ते वचन पाळणार आहे.'

स्टारबकनं यावेळी बोलायचं धाडस केलं. तो म्हणाला,

'कॅप्टनसाहेब, धन्यवाद ! सकाळपर्यंत मॉबी डिक परत येणार हे नक्की ! आपण जसे त्याच्या मागावर आहोत, तसा तोही आपल्या वासानं नक्कीच परत येणार आहे.'

स्टारबकच्या शब्दानं कॅप्टन खूष झाला. आम्हा खलाशांनाही धीर आला.

सकाळ व्हायला दोन-अडीच तास उरले होते. स्टारबकचा शब्द खरा ठरला. सूर्यानं पहिले किरण जहाजावर टाकले आणि प्रचंड शंखनाद व्हावा, तसा आवाज आला.

छातीत धडकी भरवणाराच आवाज होता तो. देवमाशानं डोक्यावरच्या नाकपुडीतून पाण्याचा उंच फवारा हवेत सोडला की असा आवाज येतो, हे मला माहीत होतं.

जहाजापासून काही अंतरावरच असं उंच कारंजं हवेत उडत होतं. कुणीतरी किंचाळलं,

'मॉबी डिक !- मॉबी डिक !'

जहाजाच्या डेकवर पुन्हा एकदा पळापळ झाली. आपल्या राठ पंजाच्या मुठी वळत कॅप्टन अहब किंचाळला,

'आज तू माझ्या तावडीतून सुटत नाहीस.'

आमच्या भावना त्या देवमाशाला अगदी स्पष्ट कळत होत्या की काय कुणास ठाऊक ! सूर्याच्या कोवळ्या किरणात तो झपकन् पाण्यातून बाहेर उसळला. डेकवर पाण्याचा लोंढा आला.

चमचमणाऱ्या चांदीचा प्रचंड डोंगर पुढं यावा, तसं मला झालं. रात्री आम्ही मॉबी डिकला पाहिला होता. पण इतका स्पष्ट नाही !

सूर्याच्या प्रकाशातील त्याचं दर्शन अद्भुत होतं.

'होड्या पाण्यात सोडा !' अहब ओरडला.

आम्ही मॉबी डिकच्या शिकारीसाठी पाण्यात उतरलो. मॉबी डिक आमच्यावर हल्ला करणार, हे उघड होतं. म्हणून आम्ही यावेळेला जरा काळजी घेतली होती.

आमच्या होड्यांमधे हल्ला करण्याचा त्याचा बेत होता. पण होड्या एकत्र न दिसल्यामुळं त्याचा गोंधळ झाला. नेमक्या कोणत्या होडीवर हल्ला करावा, हे

त्याला सुचलं नाही.

मॉबी डिकचा तेवढा एक बेसावध क्षण आम्हाला पुरला. याखेपेला सगळे खलाशी सावध होते.

त्यांनी सगळ्यांनी मॉबी डिकवर एकदम हल्ला केला. मॉबी डिकच्या रुपेरी पाठीत लांब, धारदार भाले एकामागून एक सपासप घुसले !

या खेपेला त्याच्या वेदना मॉबी डिकला जाणवल्या. संतापानं तो वेडापिसा झाला.

आपल्या शेपटीचा तडाखा देऊन त्यानं फ्लास्कची होडी हवेत उडवली. खलाशी पाण्यात फेकले गेले. कॅप्टन अहबच्या होडीची खरं तर तीच गत व्हायची. पण भाल्यांचे दोर कॅप्टननं प्रसंगावधान राखून सपासप तोडून टाकले.

आता धुमश्र्चक्री उडाली. स्टबची होडीही हवेत उडाली. याहीवेळी स्टारबकनं खलाशांना वाचवण्यासाठी जहाज मधे आणलं.

धपापणारे खलाशी फरपटत डेकवर चढले. मॉबी डिकनं जणू त्यांची शक्तीच शोषली होती.

फ्लास्क आणि स्टब- दोघंही जखमी झाले होते. कॅप्टन अहबलाही फटका बसला होता आणि देवमाशानं त्याचा डावा कृत्रिम पाय निम्मा मोडला होता.

पण याखेपेला आम्ही मॉबी डिकला जखमी करण्यात यश मिळवलं होतं.

कॅप्टन अहबनं डेकवर नजर टाकली. तो म्हणाला,

'सगळे खलाशी सुखरूप परत आले का ? एकदा नीट बघा.'

स्टारबकनं आज्ञा दिल्यावर आम्ही ओळीत उभे राहिलो.

फेदल्लाची जागा रिकामी होती !

खलाशी सगळ्या जहाजावर धावले. जहाजाचा कानाकोपरा त्यांनी तपासला. पण फेदल्ला अदृश्य झाला होता.

काय घडलं असावं, हे अगदी उघड होतं.

कॅप्टन अहबचा चेहरा दगडी शिल्पासारखा झाला. त्याचे डोळे मात्र लाल निखाऱ्यासारखे फुलून आले.

त्याचा देह प्रक्षोभानं थरथरायला लागला. त्याचा डावा पाय अर्धा मोडल्यामुळं तो वाकडा उभा होता. त्याचं रूप भेसूर दिसत होतं.

संतापानं त्यानं मुठी वळल्या आणि तो किंचाळला,

'मॉबी डिक ! सगळ्या पृथ्वीला दहा प्रदक्षिणा घालाव्या लागल्या तरी चालतील, पण तू आता जिवंत सुटू शकत नाहीस- ऐकलंस का ?- मॉबी डिक— कुठं पाताळात जाऊन लपलास, तरी तुझी सुटका नाही.'

मग कॅप्टन आमच्याकडं वळला आणि गरजला,

'मित्रांनो, मॉबी डिकबरोबर आपल्या दोन लढाया झाल्या. पहिल्या युध्दात त्यानं आपल्याला घाबरवलं खरं, पण दुसरी लढाई आपण जिंकलीय्. आपण त्या राक्षसाला जबर जखमी केलंय. -- आपले धारदार भाले त्या राक्षसाच्या पाठीत घुसले आहेत. आता त्याची सुटका होणं कठीण--- इजा- बिजा झालंच आहे, आता उद्याही मॉबी डिक येणारच-- आता तो सुटत नाही. उद्या त्याचा मृत्युलेख लिहिलेला आहे- मॉबी डिक- तू संपलास म्हणून समज- मॉबी डिक- फेदल्लाचा बदला आम्ही उद्या घेणार !'

कॅप्टन अहबचं भाषण असं आक्रमक आणि पेटवणारं होतं की आम्ही मॉबी डिकला संपवायला तयार झालो. फेदल्लाचा सूड घेण्यासाठी ! आमच्या मनातली भीती पार नाहीशी झाली.

प्रत्यक्षात काय घडणार, हे फक्त अदृष्टालाच माहीत होतं.

उद्याची सकाळ कुणाच्या मृत्यूचं निमंत्रण घेऊन येणार होती ?

***

[illegible] शाखा.
[illegible]

## ६. शेवटची झुंज !

आभाळ किंचित भरून आलं होतं. सकाळ झाली, पण सगळी मळभलेली !

सगळे खलाशी अस्वस्थपणे डेकवर येरझाऱ्या घालत होते.

त्यांच्या जोडीला कॅप्टन अहबही. मोडलेल्या अर्ध्या पायानं तो लंगडत चालत होता. संतापलेला, चिडलेला. तास- दोन तास उलटले आणि मॉबी डिक पुन्हा दिसण्याची आशा मावळत चालली.

'मॉबी डिक !,' कॅप्टन अहब गरजला, 'आपल्या युध्दाचा आजचा तिसरा दिवस आहे, तुला यायलाच लागेल. मॉबी डिक ---'

कॅप्टनचा संताप व्यर्थ आहे, असं मला वाटत होतं. फेदल्लाची जागा आता मी घेतली होती. कॅप्टनच्या होडीतून मला जावं लागणार होतं.

मला इतकी मानाची जागा मिळाली, म्हणून अजिबात आनंद झाला नव्हता. उलट कालचा सगळा उत्साह आता ओसरला होता. निदान माझा तरी.

कॅप्टन वाट्टेल तितका ओरडला, तरी आता मॉबी डिक परत येणार नाही, असंच मला वाटत होतं. इतक्यात कॅप्टन भेसूर हसला आणि ओरडला,

'मॉबी डिक- शेवटी आलास तर ! आज तू सुटत नाहीस !'

सगळ्या खलाशांनी मान वळवून पाहिलं. खरंच मॉबी डिक आला होता. त्याच्या पाठीत घुसलेले भाले लांबूनही आम्हाला अगदी स्पष्ट दिसत होते.

'कॅप्टनऽऽ !' स्टारबकनं हाक मारली, 'तुम्ही जहाजावर मागंच थांबा. आम्हीऽ--'

'होड्या पाण्यात सोडा !,' कॅप्टन गरजला, 'इस्माईल माझ्याबरोबर येईल !'

होड्या निघाल्या. समुद्राच्या पाण्यात शार्क मासे आले होते. कुणासाठी ? आमच्यासाठी का मॉबी डिकसाठी ?

आम्हाला फार पुढं जावं लागलं नाही. संथ पाण्याला दुभंगून मॉबी डिकचं प्रचंड धूड पाण्यावर आलं.

त्याच्या पाठीत भाले घुसले होते. त्याची चंदेरी पाठ आता रक्ताळली होती. घुसलेल्या भाल्यांच्या वेदना त्याला नक्कीच होत असाव्यात.

त्याच्या हालचालीतला कालचा डौल आता राहिलेला नव्हता. तो पाण्याबाहेर आल्याबरोबर धारदार भाले सपासप त्याच्या अंगात घुसले.

चिडलेल्या मॉबी डिकनं पाण्याबाहेर उसळी मारली. त्याची ताकद प्रचंड होती. स्टब आणि फ्लास्क यांच्या होड्या उंच गेल्या आणि आपटून फुटल्या. खलाशी पाण्यात फेकले गेले.

कॅप्टन अहबनं फेकलेल्या भाल्यानं मॉबी डिकला खोलवर जखम केली होती.

मॉबी डिक आता आमच्या होडीखाली आला होता. भाल्यावरची कॅप्टनची पकड अधिकच घट्ट झाली. मॉबी डिक पाण्याखालून बाहेर निघाला.

आणि त्याच्यावर भाले सोडण्याऐवजी आम्ही थिजलोच. अक्षरशः थिजलो.

मॉबी डिकच्या डोक्यावर दोरात गुंडाळलेलं फेदल्लाचं प्रेत अडकून राहिलं होतं.

सगळेजण आश्चर्यानं बघत राहिले.

तेवढ्यात बाहेर आलेल्या मॉबी डिकनं पाण्यात खोल सूर मारला.

आणि आमच्या बाजूला येण्याऐवजी तो अवाढव्य देवमासा पुढं निघाला. कॅप्टननं त्याचा पाठलाग करण्याची आज्ञा केली.

होड्या पुढं निघाल्या. कॅप्टननं जहाजावरच्या स्टारबकला ओरडून सांगितलं,

'स्टारबक, जहाज घेऊन सावधानपणे आमच्या मागून ये. जहाजाची गती धिमी ठेव !'

शेवटच्या जीवघेण्या पाठलागाला सुरवात झाली. तीन दिवस आम्ही मॉबी डिकचा पाठलाग करत होतो.

जखमी झालेल्या त्या अजस्त्र प्राण्यानं आम्हाला गुंगवण्याचा खूप प्रयत्न केला. पण त्याचा प्रवास सोपा नव्हता. भाल्यांनी त्याच्या मर्मस्थानावर आघात केले होते.

रक्त वाहून गेलेला देवमासा नक्कीच थकलेला होता.

जीवघेणा पाठलाग आणि रक्त गोठवणारं युध्द आता सुरू झालं होतं.

तिसऱ्या दिवशी आम्ही त्याला गाठलं. देवमासा आणि आमच्या होड्या यामधील अंतर कमी व्हायला लागलं. अहबच्या शरीरावरच्या शिरा फुगल्या.

तोंडानं तो त्या देवमाशाला वारंवार शिव्या घालत होता. आमची होडी मॉबी डिकच्या जवळ पोचली.

अहब काय जबरदस्त भालाफेक करू शकतो, हे मला त्यावेळी जवळून पाहण्यास मिळालं.

मॉबी डिकजवळ गेल्याबरोबर दोन्ही हातातले दोन धारदार भाले अहबनं हातात पेलले आणि पुढच्याच क्षणी सर्व ताकदीनिशी त्या प्रचंड देवमाशाच्या अंगात खुपसले.

अहबचा हा प्राणांतिक घाव होता.

एवढा तो प्रचंड आणि अजस्त्र देहाचा देवमासा- त्या घावानं नक्कीच कळवळला असणार.

संतापून त्यानं पाण्याबाहेर उसळी घेतली आणि एका तडाख्यात आमची आणखी एक होडी भिरकावून दिली.

बेभान झालेला कॅप्टन ओरडतच होता-

'येऽ येऽ राक्षसा- आता तुला सोडत नाही. आजचं तुझं हे शेवटचंच सूर्यदर्शन !'

पाण्यात मॉबी डिकचं तांडव चाललं होतं. अचानक त्याला वेगळा वास आला असावा.

आमची खरी ताकद कशात आहे, हे त्यानं बरोबर ओळखलं, हेरलं. आणि त्यानं दिशा बदलून त्याचा मोहरा एकदम जहाजाकडं वळवला.

अहबनं ते पाहिलं मात्र- त्याचा चेहरा भीतीनं पांढराफटक झाला.

'मॉय गॉड !', तो किंचाळला, 'हा राक्षस तर जहाजावर हल्ला करण्यासाठी जातोय्. होड्या वळवा- मॉबी डिकचा पाठलाग करा.'

खलाशांनी जिवाचं रान करून होड्या चालवायला सुरवात केली. माझ्यासारखा कणखर आणि तरूण मनुष्य ! पण माझी छाती फुटायची वेळ आली.

पण मॉबी डिक प्राणांतिक जखमी झालेला असूनही आमच्यापेक्षा अधिक ताकदवान होता. चपळ होता.

डोक्यावरच्या नाकपुड्यातून पाणी बाहेर फेकत आणि शंखनादासारखा आवाज करत तो आमच्या जहाजाकडं अतिशय वेगानं निघाला.

लांबूनही मला स्पष्ट दिसलं- डेकवर एकच पळापळ झाली.

स्टारबक त्या अजस्त्र माशाकडं फक्त आऽ वासून बघत राहिला. इतर सर्व खलाशांचीही तीच अवस्था झाली होती.

आपण आता वाचत नाही, हे त्या देवमाशाला जणू कळलं होतं. पण मग आम्हालाही जगायची संधी तो देणार नव्हता.

समुद्राच्या पाण्याचं पोट चिरत मॉबी डिक वेगानं पुढंच जात होता. थेट आमच्या जहाजाकडं.

अहब आता जणू पिसाळला होता.

मॉबी डिकच्या नावानं तो शिव्यांची लाखोली वाहात होता.

मॉबी डिकनं आम्हाला आता मागं टाकलं होतं. तो रक्ताळलेला देवमासा आमच्या 'पिकॉड'जहाजाजवळ पोचला.

डेकवरची माणसं भीतीनं सुन्न होऊन फाटलेल्या डोळ्यांनी मॉबी डिककडं बघत होती.

आता मॉबी डिक आणि जहाज यांच्यात तसं काही अंतर उरलेलं नव्हतंच.

पुढं जे पाहायला मिळालं ते अक्षरशः काळीज फाटून टाकणारं होतं.

मॉबी डिकनं सगळ्या ताकदीनिशी जहाजावर हल्ला चढवला. आमचं मर्मस्थान त्या माशाच्या लक्षात आलं होतं आणि तेच त्याला पूर्णपणे नष्ट करायचं होतं.

त्याच्या शेपटीच्या तडाख्याबरोबर जहाजाच्या बांधणीला उपयोगात आणलेल्या लाकडी फळ्या हवेत उडाल्या.

मग मॉबी डिक त्याच्या सगळ्या ताकदीनं जहाजावर फटक्यामागून फटके मारत राहिला.

घावामागून घाव--घावामागून घाव--- चिराळलेल्या जहाजाचे एकेक भाग समुद्रात कोसळायला लागले.

किंकाळ्यांनी आभाळ भरून गेलं.

मॉबी डिकनं एक मुसंडी तर अशी मारली की जहाजाला प्रचंड भोक पडलं.

जहाज एका बाजूला कलंडलं आणि पाण्याचा प्रचंड लोंढा जहाजात शिरला.

समुद्राच्या पाण्यानं जहाजातलं जीवन गिळायला सुरवात केली. माणसं, पेट्या, पिपं, लाकडी साहित्य---

'माझं पिकॉड ! माझं पिकॉड !'--- संतापानं बेभान झालेला कॅप्टन अहब किंचाळत होता.

आमची होडी मॉबी डिकजवळ पोचली. त्याचवेळी तो नेमका पाण्यातून वर उसळला होता. जबर ताकदीनं !

तो एक क्षण अहबसारख्या अनुभवी शिकाऱ्यानं टिपला.

सगळी ताकद एकवटून अहबनं हातातला भाला मॉबी डिकच्या जबड्याखाली मारला. त्या फेकीची ताकद अशी होती की गळ्याखालून आत गेलेला तो भाला मॉबी डिकची जीभ छेदून वर आला.

भयंकर !

एवढ्यात आणखी एक भयंकर घडलं. पाण्याच्या लोंढ्यामुळं आमची होडी गर्रकन् त्याच जागी वळली. कॅप्टन अहबचा तोल गेला. त्याच्या हातातल्या भाल्याला जोडलेली दोरी अहबच्या गळ्याभोवती गुंडाळली गेली.

पिसाटलेल्या माशानं आता पुढं धडक मारली होती. दोराला ताण बसल्याबरोबर आमच्या होडीतला अहब एकदम हवेत फेकला गेला.

पुढच्याच क्षणी समुद्राच्या उसळलेल्या पाण्यात अदृश्य झाला.

सुन्न होऊन मी बघत राहिलो.

घडलं, ते अतर्क्य होतं. मॉबी डिकला इतक्या प्राणांतिक जखमा झाल्या होत्या की तो आता जगणं अशक्य होतं.

पण मरतांना त्यानं अहबलाही बरोबर नेलं. मॉबी डिक जिवंत होता, तोपर्यंत कॅप्टन अहबच्या आयुष्याला काही अर्थ होता.

मॉबी डिक संपल्यावर अहबनं जगून तरी काय करायचं ?

भीतीच्या धक्क्यातून बाहेर पडल्यावर माझ्या लक्षात आलं !

आमच्याही होडीचे तुकडे तुकडे झाले होते आणि मी समुद्राच्या पाण्यात होतो.

जखमी झालेल्या माझ्या काही सहकाऱ्यांवर शार्क मासे तुटून पडले होते.

मी मनात देवाची प्रार्थना केली. यातून मी वाचणं आता केवळ अशक्य होतं. केवळ अशक्य !

कोणत्याही क्षणी मला शार्कच्या जबड्यात जावं लागणार !

लाटांच्या फटक्यानं मी सगळीकडं फेकला जात होतो. इतक्यात माझ्या हाताला काहीतरी लागलं. त्याचा आधार घेत मी त्या लाकडीऽ---

--- बापरे ! केगसाठी तयार करून घेतलेली ती शवपेटी होती !

केग यावेळी कुठं असेल ? एवढं प्रचंड युध्दझालं होतं की कोण कुठं गेलं असेल, हे सांगता येणं कठीण होतं.

माझ्या बऱ्याच सहकारी खलाशांना मॉबी डिकनं गिळलं होतं.

उरलेले शार्क माशांच्या पोटात गेले होते !

माझा थकलेला देह शवपेटीवर पडला. माझ्या अवतीभवती पाण्यात अजूनही शार्क मासे होते ! पण कदाचित माझ्या अंगावर जखम नसल्यामुळं त्यांनी माझ्यावर अजून हल्ला केला नव्हता !

लाटांच्या तडाख्याबरोबर शवपेटी इतस्ततः भरकटली जात होती.

असल्या आचरट साहसाला मी कबूल होऊन पिकॉडवर दाखल कसा झालो, याचंच मला आश्चर्य वाटत होतं.

कॅप्टन अहबचा चेहरा माझ्या डोळ्यासमोरून हलत नव्हता. त्या एका माणसाच्या व्यक्तिगत सूडाच्या भावनेसाठी आमच्यापैकी कितीजण हकनाक बळी गेले होते ?

पण शेवटच्या क्षणी मॉबी डिकनं कॅप्टनला नेलंच. मग एवढा अट्टाहास करून काय मिळालं ? जहाज गेलं, माणसं गेली- सगळंच गेलं.

बहुधा मी एकटाच उरलोय्.

पण-- पण- हे स्वप्न तर नाही ? मधे काही तास गेल्यावर माझा मेंदू थोडा काम करायला लागला आहे.

-- आणि अचानक माझ्या लक्षात आलं ! मी तरी कुठं जगणार आहे ?

शरीराच्या सगळ्या शक्ती क्षीण झाल्या आहेत. जवळ अन्न नाही, पाणी नाही.

या शवपेटीवर किती तग धरता येईल ? एक-दोन दिवस-- मग हा इस्माईलही खलास होणार ! काय घडलं हे सांगायलाही कुणी जिवंत राहिलेलं नसणार !

डोळे जडावले. घसा कोरडा पडला आणि आता शेवटी भुकेची जाणीवही मरायला लागली आहे. मी बेशुध्द होत असल्याची जाणीव मला झाली.

इतक्यात कुणाचे तरी चेहरे मला दिसायला लागले. कोण असावं ? मॉबी

छे ! ही तर माणसं दिसताहेत.

कुणी बलदंड हातांनी मला शवपेटीवरून उचललं. मी जहाजाच्या डेकवर आल्याची मला जाणीव झाली.

आणि पुरा बेशुध्द होण्यापूर्वी मी समोरचे चेहरे ओळखले- रॅचेल जहाजावरची माणसं होती ती !

मॉबी डिक मेल्यापेक्षा मी वाचलो हाच मोठा चमत्कार होता !

पण वाचलो !

नाहीतर मॉबी डिकची एवढी चित्तथरारक कथा तुम्हाला कुणी सांगितली असती ?

देवाशपथ सांगतो, सकाळी उठलो ना की देवाच्या नावाऐवजी माझ्या ओठावर दोनच शब्द येतात,

'मॉबी डिक !'

सं. कार्वे, वाचनालय
बाल ... विभाग
क्र. 2LLe
विषय का. वा.
BVBK-0402889

'होड्या स्वतंत्र करा !,' अहब गरजला, 'स्टारबक - फ्लास्क, स्टब - क्विक - चला, एकदम जल्दी करा.

कॅप्टनच्या आज्ञेबरोबर होड्या ताबडतोब पाण्यात सोडण्यात आल्या. आम्ही सगळे खलाशी विभागून नावात बसलो. पाण्यावर वल्ही झप्‌झप् वाजायला लागली.

जहाजावरच्या कावळ्याच्या घरट्यातून फेदल्ला ओरडतच होता. देवमासे कुठे आहेत त्याची दिशा आम्हाला दाखवत होता.

मी केगकडं पाहिलं. देवमाशाच्या शिकारीची धुंदी त्याच्या डोळ्यावर चढलेली होती. त्याच्या दंडाचे स्नायू दरारले होते.

डॅगू आणि तॅश्तेगो जोरजोरात ओरडत होते. या सगळ्या गोंधळात मी जरा बावचळलोच होतो. मी स्टारबककडं पाहिलं. तो अनुभवी आणि शहाणा मनुष्य मात्र अतिशय शांत होता.

केग आता पिसाटल्यासारखा किंचाळत होता,

'देवमासा ! देवमासा ! वल्हवा, जोरात वल्हवा'

जहाज मागं टाकून आम्ही आता खूपच पुढे आलो होतो. मी मागं वळून पाहिलं. जहाजावरचा फेदल्ला अजूनही ओरडत होता. त्याच्या हालचालीवरून माझ्या ते लक्षात आलं. पण त्याचा आवाज मात्र आता आम्हाला ऐकू येत नव्हता.

माझ्या होडीमधे स्टब होता. त्यानं माझ्या खांद्यावर थोपटलं आणि तो म्हणाला, 'पोरा, पाहिलंस का? आभाळ एकदम भरून आलंय्. आता बहुधा पाऊस कोसळणार.'

इतक्यात माझं लक्ष समोर गेलं. समुद्राच्या पाण्याखाली दोन देवमाशांच्या पाठी चांदीसारख्या दिसत होत्या.

माझ्या मनावर एकदम दडपण आलं. पण त्याचक्षणी मी जोरात ओरडलो,

'देवमासे !'

होड्या झप्‌झप् देवमाशांकडे निघाल्या. पण अवघ्या दोन मिनिटात सगळं वातावरण गढूळलं. समुद्र उसळला. आभाळात ढग जमले. उसळत्या लाटाखाली आमच्या होड्या इकडं तिकडं फेकल्या जाऊ लागल्या.

तशाही परिस्थितीत आम्ही जिद्द सोडली नव्हती. पण त्या उसळत्या पाण्यात आता देवमासे जणू अदृश्य झाले होते. आता काय करायचं ?